# आनंदलहरी

## श्री दत्तमहाराज कवीश्वर यांची प्रवचने

भाग – ५

# आनंदलहरी

श्री दत्तमहाराज कवीश्वर

यांची

प्रवचने

भाग – ५

सर्व हक्क प्रकाशकाचे स्वाधीन

प्रकाशन दिवस
प.पू. श्री दत्तमहाराजांचे पुण्यस्मरण (फाल्गुन शु. १४ शके १९२९)
शुक्रवार, दि. २१ मार्च, २००८

मुखपृष्ठ
आमोद दामले

मुद्रक
रमा एन्टरप्राईझेस
३९, स्वामी समर्थ नगर,
बंडू गोखले पथ, गिरगांव, मुंबई ४०० ००४.
दूरध्वनी : २३८५ २८४६
भ्रमणध्वनी : ९३२३२९१०३४

प्रकाशक
श्री दत्त आश्रम संस्थान
प.पू. श्री दत्त महाराज कवीश्वर मार्ग,
सद्गुरु नगर, प्रशांती नगर समोर,
जालना - ४३१ २०३.
दूरध्वनी : ०२४८२ २३६८०५

**॥ श्री गुरुदेव दत्त ॥**

***दत्तात्रेय त्वां नमामि प्रसीद***
***त्वं सर्वात्मा सर्वकर्ता न वेद ।***
***कोप्यंतं ते सर्वदेवाधिदेव***
***ज्ञाताज्ञतान्मे पराधान्क्षमस्व ॥***

भगवान शंकराचार्य महाराजांनी सर्व देवतांची स्तोत्रे केलेली आहेत. गणेश आहे, देवी आहे. शंकर, विष्णू, सूर्य नारायण. ***सर्वत्र एक परमेश्वर आहे हा त्यांचा सिद्धांत आहे.*** म्हणजे जीवसुद्धा निराळे नाहीत. ईश्वराची अनेक स्वरुपे आहेत. पण तो एकच ईश्वर आहे, अनेक रुपांनी. इतकंच नव्हे तर जगामध्ये दिसणारे सर्व जीवसुद्धा परमेश्वर स्वरुपच आहेत. ***ईश्वररूप सगळं जग आहे, असं पहावं, असा अभ्यास करावा असं उपनिषदामध्ये सांगितलेले आहे.***

म्हणून जरी भिन्न भिन्न देवता आपल्याला व्यवहारात दिसतात, ज्याच्या त्याच्या आवडीप्रमाणे जो तो भक्ती करत असतो तरी सर्वत्र एक परमात्मा आहे. जगाची उत्पत्ती करणं, तारण करणं आणि संहार करणं ही कार्य त्या ईश्वराकडून चालू आहेत. भिन्न भिन्न रुपं त्याने धारण केली. ब्रह्मा, विष्णू, महेश.

विष्णूंनी सर्व जगाचं संरक्षण करण्याचं कार्य आणखी घेतलेलं आहे. सगळ्यांचं पालन करायचं. 'भयकृत भयनाशन:' दोन्ही त्याची रुपं आहेत. भय निर्माण करतो. भय दूरही करतो. आणि ते सगळंही संरक्षण आहे. भय निर्माण केलं तरी ईश्वराचं ते संरक्षण आहे, अशी भक्तांची भावना असते.

पांडव वनवासात गेले. बाह्य व्यवहार दृष्टीने त्यांचं साम्राज्य कौरवांनी घेतलं आणि त्यांना वनवास पत्करावा लागला. व्यवहार दृष्टीने हे किती तरी विपरीत दिसते. पुष्कळ कष्टं पडले, दु:ख सहन करावे लागले असं आपण समजू. परंतु वनामध्ये असेपर्यंत पांडवांचा जसा गृहस्थाश्रम चालू होता तसा दुर्योधन राजाला सुद्धा करता येत नव्हता. मोठे मोठे ऋषी वनामध्ये यायचे. त्यांच्याबरोबर चर्चा करावी. धर्माधर्माचा विचार प्रत्येक दिवशी त्यांनी करायचा.

***धर्माधर्माचा विचार प्रत्येकाने करावा असं सांगितलंय, रात्री झोपेच्या वेळेला. सकाळी उठल्यापासून आत्तापर्यंत आपल्याकडून काय काय पुण्य झालं आणि काय काय पाप झालं याचा विचार करून निजावं म्हणतात. आपण सत्पुरुषांच्या प्रमाणे वागलो का पशुप्रमाणे वागलो. आत्मपरीक्षण करावं.***

धर्मराज आणि त्याचे सगळे बंधू वनामध्ये गेले. काही ऐषआराम नाही. कुठं तरी आपलं झोपडी बांधून राहायचं. परंतु इतकं पुण्य त्यांच्याकडून घडलं. इतकं अन्नदान घडलं. त्या द्रौपदीनं केलेलं आहे. सूर्यनारायणाने पात्र दिलेलं होतं. आणि सूर्योदय झाल्याबरोबर त्याची पूजा केली की त्याच्यातून वाटेल तितकं अन्न मिळायचं. काळजी नाही. आज इतकी मंडळी जेवायला येणार. स्वयंपाक व्यवस्थित झालाय की नाही. कमी तर पडणार नाही ना ! काही काळजी नाही. सूर्य नारायणाची प्रार्थना त्याकरताच धर्मराजांनी केली. येणारे जे काही ऋषी मुनी वगैरे आहेत, त्यांना अन्न मिळालं पाहिजे. ही भावना आहे.

आधिदैविक विभाग म्हणून आहे आपल्या संस्कृतीमध्ये. पण

आधिभौतिक विभागाकडेच आपलं लक्ष आहे फक्त. परंतु आधिदैविक विभागही असतो. आपल्या इन्द्रियांच्या पुष्कळ देवता आहेत. प्रत्येक इन्द्रियांच्या देवता आहेत. वेगळ्या वेगळ्या देवता. त्यांच्याशी संबंध त्या देवतांचा असतो, तो पर्यंत कार्य त्या इन्द्रियांकडून होत राहातं. त्या आधिदैविक विभागाकडे लक्ष देणारे पांडव होते. आध्यात्मिक तर आहेच आहे. आत्मा, परमात्मा, ईश्वर कोण आहे याचाही विचार करणारे ते होते. तर व्यवहारामध्ये वनात जाऊन राहाणे म्हणजे काही सुख नाहीये. राजवाड्यामध्ये राहाणारे हे, त्यांना वनामध्ये सुख कसे असेल? परंतु त्यांची जी दृष्टी होती ती धर्म दृष्टी, पुण्य दृष्टी होती. लोमश ऋषी त्यांना म्हणाले, ''तीर्थ यात्रेला जाऊ या'', तीर्थ यात्रेला निघाले. राज्यावर असते तर रथ, सैन्य वगैरे घेऊन गेले असते. इथं कांही नाही. पायांनीच तीर्थयात्रा. इथं जवळ साधन सामग्री कांहीच नाही ना ! शरीराचेही श्रम आहेत. वाणीनही भगवंताचं नामस्मरण चाललेलं आहे. मनानं चिंतन चाललेलं आहे. अशी तीर्थयात्रा त्यांनी भारतवर्षामध्ये केली.

काया वाचा मनाने जे पुण्य घडले ते पुण्य हे सुद्धा एक मोठं त्यांना अनुकूलच झालं की नाही. जरी अशी परिस्थिती आली असली तरीसुद्धा वनामध्येही ईश्वराने त्यांच्याकडून धर्माचरण करुन घेतले. अधर्माचं कधीही आचरण नाही. सामग्रीच नाही जवळ. वाहनाची व्यवस्था नाही. पायांनीच तीर्थयात्रा करावी लागली. म्हणजे साम्राज्य गेलं ते बरं झालं का आणखी वाईट झालं? हाही एक विचार करण्यासारखा प्रश्न आहे.

साम्राज्य मिळवलं त्यांनी. स्वत: राजसूय यज्ञ केला. सगळी

एकंदर पृथ्वी जिंकली. आणि गेलं. संपलं.परंतु ते साम्राज्य जवळ नसतांनासुद्धा आणखी त्यांच्या हातून किती तरी सत्कर्म झाली. अहोरात्र देवाचं नामस्मरण चाललेलं आहे. बारा वर्षे वनवास आणि एक वर्ष अज्ञातवास. तेरा वर्षे काढावी लागली. पण त्याच्या मध्ये किती तरी पुण्यसंचय झालेला आहे. अन्नदान करीत होते. कुणी पैसे मागायला आला तर त्यांच्याजवळ कांही नाही. कांही व्यवस्था असेल. परंतु राज्यावर असताना जितकं धन देता येईल तितकं या वेळेला कसं देता येईल?

तर हे सगळे दोष, मनाचे, वाणीचे, शरीराचे, कोणतेही दोष राहू नयेत, या करता जी काही सत्कर्म शास्त्रकारांनी सांगितली ती सगळी सत्कर्म त्यांनी केलेली आहेत. ही ईश्वराची खरी कृपा समजले ते. वनामध्ये आपण राहिलो ही देवाची कृपा अशीच त्यांची समजूत होती. एखाद्या वेळेला वाटायचं त्या द्रौपदीला. पण तिनं कांही धर्म सोडला नाही शेवटपर्यंत. आपण मिळवलेलं राज्य शत्रूने घेतलं कपटानं, असे एखाद्या वेळेला विचार येत असतील मनामध्ये. परंतु कृष्णभक्ती मनांत होती, त्यामुळे तिच्या मनाचं समाधान होतं. म्हणून तेरा वर्षांच्या त्या दिव्यातून ते पार पडलेले आहेत.

पांडवांचा शोध करण्याकरता कौरवांनी पुष्कळ प्रयत्न केले. कारण त्यांनी ठरवलं होतं एक वर्ष अज्ञातवासामध्ये पांडव राहिले पाहिजेत. त्या वर्षी जर पांडवांना शोधून काढलं कौरवांनी, पांडव अमुक ठिकाणी आहेत अशी जर बातमी मिळाली आणि जर त्यांचा शोध लागला तर पुन्हा बारा वर्षे वनवास आणि एक वर्ष अज्ञातवास. अशी अट होती, तरी धर्मराजांनी कबूल केली म्हणजे जन्मभर

वनवासामध्ये राहाण्याची पाळी आली असती. परंतु भगवान गोपालकृष्णांची इच्छा आहे. त्या ईश्वराच्या इच्छाशक्तीने सगळी कार्य होत असतात. दुर्योधनाचे हेर त्यांच्या पाठीमागे होते, कुठं जातात पांडव, कुठं राहातात, काय करतात. बारा वर्षे संपत आल्यानंतर तर जास्तीच हेरांचे जाळं होतं. कारण तेराव्या वर्षी कुठं राहातात, ते शोधून काढायची ती सोय होती.

पण पत्ता लागला नाही. पांडव कुठं गेले ते कळलं नाही. एक वर्ष राहीले. त्यांचा शोध कसा लागेल म्हणून चिंताग्रस्त होते सगळे, दुर्योधन वगैरे, कौरव मंडळी. भीष्म, द्रोणांनी सांगितले, पांडवांचा शोध तुमच्या सी. आय. डी. खात्याकडून होणं शक्य नाही. सांपडणार नाहीत ते. त्यांना तर यमधर्मांनी वरदान दिलं होतं. दुर्गादेवीने वरप्रदान केलं होतं. तुम्ही आपल्या मुळच्या वेषात जरी फिरलात तरी तुम्हाला कुणीही ओळखणार नाही.

अशा रीतीने पांडवांना जन्मभर आणखी वनामध्ये राहाता यावं अशी व्यवस्था जरी कौरवांनी केली असली तरी बारा वर्षेपर्यंत पांडव कुठे राहातात, कोणत्या वनामध्ये राहातात, कुठं तीर्थयात्रेला गेलेले आहेत हे सगळं त्यांना कळत होतं. पण शेवटच्या वर्षी पत्ता नाही कुठं गेले पांडव. म्हणून भीष्म द्रोणांनी सांगितलं, पांडवांचा शोध असा लागणार नाही. कसा लागेल? ज्या देशामध्ये लोकांची मनोवृत्ती धर्मानुकूल झालेली आहे, गुणग्राहक लोक आहेत, केवळ दोषाकडे पहाणारे लोक ज्या देशात नाहीत त्या देशात पांडव असतील, हे त्यांनी सांगितलं. पांडवांच्या गुणांचा विकास ज्या ठिकाणी झालेला असेल तिथं तुम्हाला पांडवांचा शोध निश्चित लागेल.

पण तशी स्वत:ची बुद्धी नाही, कोण लोक, कसे आहेत, धर्मशील कसे आहेत, त्या दृष्टीने चौकशी करायला पाहिजे. तर ही अशी भगवत् भक्ती त्यांच्या जवळ होती, त्यांनी जे ईश्वराला आनंद व्हावा, संतोष व्हावा असे गुण मिळवले होते आणि गुणांकडे त्यांचे लक्ष होते. ***ते गुण कायम राहिले पाहिजे. काही चांगल्या संगती मध्ये असेपर्यंत चांगले गुण असतात. पुन्हा दुसरी बिघडलेली संगती मिळाली की पुन्हा गुण जातात.*** तर गुण उत्पन्न होणं, ते अधिकाधिक वृद्धिंगत होणं या करता पांडवांचा प्रयत्न अहर्निश चालू आहे. राज्याकडे विशेष लक्ष नाही. मिळवलं राज्य त्यांनी शेवटी.

गोपालकृष्णांची तशी इच्छा होती, धर्मराज राजा झाला पाहिजे, भारतवर्षाचा. त्यांची इच्छा होती. ईश्वराची इच्छाशक्ती आहे.त्या इच्छाशक्तीपुढे कोणालाही जाता येत नाही. जरी दुर्योधनाने,कौरवांनी पुष्कळ सैन्य आणलं तरी ही भगवंताची इच्छा, धर्मराज राजा व्हावा, अशी का झाली?

युद्धाच्या ऐन वेळेला अर्जुन अगदी भिऊन गेला. काय माझ्या हातून केवढं पाप होणार ! सगळ्या लोकांना आणखी मारावं लागणार. अर्जुनाने मारलं असतं त्यांना. युद्धाचेही काही आणखी नियम आहेत. धर्मयुद्धं म्हणून करायचं आहे. युद्धं जरी करत होते लोक तरी संध्याकाळ झाल्याबरोबर युद्धं बंद. नंतर एकमेकांकडे जाणं येणं असं चालू होतं. हे काही कपट नाही, अधर्म नाही. शस्त्र हातातून खाली पडलेलं आहे, नि:शस्त्र झालेला आहे आपला प्रतिस्पर्धी त्याच्यावर शस्त्र सोडायचं नाही. युद्धं बंद करायचं असे सगळे नियम पाळले होते. जरी पुष्कळ मोठी मोठी अस्त्रं जवळ असली तरी वाटेल

त्याच्यावरती सोडायची नाहीत. संयम होता त्यांचा. ***संयमाशिवाय धर्माचं पालन होऊ शकत नाही, धर्माचरण होऊ शकत नाही. संयमाची जरुरी आहे. मन मोकळं सुटलं आहे. इन्द्रिय आणखी सगळी अनावर झाली आहेत. अशा वेळेला धर्माचरण होत नाही. आणि ते जरी झालं तरी ईश्वराचा प्रसाद, संतोष होऊ शकत नाही.***

पांडवांच्या जवळ संयमही पूर्ण आहे त्याशिवाय बारा वर्षे वनवासात कसे राहिले? आम्ही राहाणार नाही म्हटलं असते मध्येच तर? कबूल केलेलं आहे आणखी राहाणार नाही असं कसं म्हणता येईल? तर त्यांनी तो संयम पाळलेला आहे. त्यामुळे त्यांचे बल जास्तीत जास्त वाढत चाललेलं आहे. ***मनाचा संयम झाला पाहिजे, निग्रह झाला पाहिजे, म्हणतात. पाणी वाहतंय सारखं, त्याला जर बांध घातला, सेतू बांधला तर त्या पाण्याची शक्ती पुष्कळ वाढते आहे. किती तरी त्याचा उपयोग करून घेतात. वीज निर्माण होते. किती तरी कार्य होतं.***

***त्याच प्रमाणे मनाच्या प्रवृत्ती ज्या सारख्या बाहेर जात आहेत त्या जर आवरल्या, मनाच्या वृत्ती जर थांबवता आल्या, तर त्या मनाची शक्ती किती तरी वाढणारी आहे. निरोध त्याला म्हणतात.चित्तवृत्ती निरोध. निग्रह करणं.***

अर्जुनाला निग्रह करता आला नाही. धर्माधर्माचा विचार करता आला नाही. आणि माझ्या हातून हिंसा होणार. इतक्या लोकांना मी मारणार. त्यापेक्षा युद्धं न करता वनामध्ये जाऊन राहातो. आत्तापर्यंत वनातच होता, बारा वर्षे. ते वनात राहणं निराळं आहे. आणि आत्ता

युद्धाकरीता उभा राहिलेला असताना वनात जाऊन राहावेसे वाटते ही चूक झाली, म्हणाले भगवान. त्यांना समजूत करावी लागली.

हे वनात जाणं नाही. हा अधर्म आहे.समोर सगळे आणखी शत्रू येऊन उभे राहिलेले आहेत आणि त्या वेळेला अहिंसा म्हणून निघून जायचं हा अधर्म आहे. हा धर्म होणार नाही. म्हणून संपूर्ण गीता ज्ञान त्याला सांगून, विश्वरुप दाखवून आणखी त्याची खात्री करुन दिली आणि त्याच्या मनाला स्वच्छ केले. निग्रह केला. हिंसा करावी का अहिंसा करावी? काय करावं? त्याचे सगळे विचार चालले होते. ते विचार स्थित झालेले आहेत. बुद्धी स्थिर झाली आणि मग तो उठलेला आहे युद्धाला. ''करिष्ये वचनं तव'' तुमची आज्ञा मला मान्य आहे. ज्या वेळेला अर्जुनाच्या मनातला मोह निघून गेला, विचार सगळे निघून गेले, निर्मोह अंत:करण झालेलं आहे त्या वेळेला स्थिर झालं चित्त. आपलं कर्तव्य काय आहे याची पूर्ण जाणीव झाली. त्यावेळी मात्र तो, संजय. त्याने सगळी गीता ऐकली. त्याची ऐकण्याची सगळी व्यवस्था केलेली होती, व्यास महर्षींनी. त्यांच्या मनाचा संयम, मनाच्या वृत्तीचा निरोध, सगळं असल्यामुळे, दूर श्रवणाचं यंत्र काही तिथं नव्हतं. पण तो बसल्या जागेवरून संबंध लढाईतील हकिकत रोज सांगत होता. दिसत होतं त्याला. गीता भगवंतांनी सांगितली अर्जुनाला रणांगणावर, संजयाने ऐकली इथे राजवाड्यात आणि धृतराष्ट्राला सांगितली. आणि शेवटी त्याने निर्णय दिलेला आहे.

अर्जुनाच्या मनातला मोह ज्याने दूर केला, अर्जुनाच्या मनाचा निग्रह ज्याने करुन दिलेला आहे, तो ज्या बाजूला आहे त्याच बाजूला विजय मिळणार--

*यत्र योगेश्वर: कृष्णो यत्र पार्थो धनुर्धर: ।*
*तत्र श्रीर्विजयो भूतिर्ध्रुवा नीतिर्मतिर्मम ॥ १८.७८ ॥*

माझे मत आहे, म्हणाला. त्यांच्याच मंत्र्यांने त्यांना - धृतराष्ट्राला - असें सागितलं आहे. तुम्हाला विजय मिळणार नाही. त्या बाजूला विजय मिळणार. हे सगळं त्याने निरीक्षण केलं आहे. बाह्य भौतिक शक्ती मोठी का मानसिक शक्ती मोठी हा विचार करणारे ते होते, संजय. चांगला उत्तम मंत्री होता. जरी कौरवांचा मंत्री असला तरी सुद्धा मनाचा आणखी ताबा होता, विचारी होता. धृतराष्ट्राला - आपल्या मालकाला बरं वाटेल असं सांगायचं असं नाही. विजय त्यांना मिळणार आहे असं कुणी सांगेल काय त्यांचा मंत्री? त्याला ठेवतील का? पण काही भीती नाही.

याचं कारण असं आहे की पांडवांनी शक्ती मिळवली होती, मोठे धनुर्धारी होते पांडव. अर्जुन आहे- यत्र पार्थो धनुर्धर: याचाही त्याने उल्लेख केला आहे. ईश्वराची शक्ती तर आहेच आहे, म्हणाला. ''यत्र योगेश्वर कृष्णो'' त्या बाजूला ईश्वर शक्ती आहे. आणि धनुर्धारी, व्यवहारामध्ये असणारी आवश्यक ती शक्ती तीही यांच्या बाजूला आहे, अर्जुनाच्या रुपाने. तुम्हाला विजय कसा मिळेल? काय तुमच्या बाजूला आहे? अर्जुनाने किती तरी वेळेला तुमचा पराजय केलेला आहे पूर्वी.त्याला ते अशक्य काही नाही.

त्या महाभारतामध्ये एका अध्यायात, एकदा सगळी मंडळी बोलत बसली होती. भीष्माचार्य, द्रोणाचार्य, अर्जुन सगळे होते. हे इतकं सैन्य किती वेळात मारता येईल हा विचार चालला होता. भीष्म म्हणाले, मला एक आठ, दहा दिवस लागतील. कारण मारायचं

म्हणजे नुसतं मारायचं नाही. सगळं नियमानं केले पाहिजे. कुणाजवळ शस्त्र नसेल त्या वेळेला युद्धं बंद करायचं. मग लवकर कसं मारता येईल. अश्वत्थामा म्हणाला, एक महिना लागेल.

अर्जुन म्हणाला, डोळे झाकून उघडे पर्यंत हे सगळे सैन्य मी मारुन टाकेन पण नाही. मला तसं करता येणार नाही. अस्त्र शक्ती त्याने मिळवली होती. ईश्वराची कृपा आहे. गुरुकृपा आहे. द्रोणाचार्य महाराजांची. सगळी अस्त्रविद्या त्याच्याजवळ आहे. त्यामुळे तो अगदी आत्मविश्वासाने बोलतोय. बोलता बोलता त्याने आपली शक्ती सांगितली. पण तसं करायचं नाही. भीष्माचार्य काय, द्रोणाचार्य काय मोठे मोठे वीर होते. परंतु त्यांनी आपल्या शक्तीला आवरलेलं आहे. मनाचं दमन केले. मनाचा निग्रह केला आणि युद्धं केलं. ईश्वराच्या शक्तीचंही सहाय्य पाहिजे. आणि स्वत:च्या मनाचंही सहाय्य पाहिजे. ह्या दोन्ही प्रकारचं सहाय्य आणि शक्ती पांडवांना मिळालेली आहे. त्यांच्या जवळ दया आहे. मनाचा निग्रह आहे. नम्रता आहे. कृतज्ञता आहे. गुरुजनांच्याविषयी अत्यंत आदरभाव मनामध्ये आहे. हे सगळे गुण मिळवण्याकरता त्यांनी प्रयत्न केला.

***सात्विक प्रकृती, दैवी प्रकृती, दैवी संपत्ती ज्याला म्हणतात ती संपत्ती जास्तीत जास्त आपण मिळवायची. मनुष्य जन्म त्या करिता आहे. बाहेरच्या संपत्तीला विशेष महत्व नाहीये. दैवी संपत्ती गीतेच्या सोळाव्या अध्यायात सांगितलेली आहे. सात्विक प्रकृती. आपली बुद्धी सात्विक बनली पाहिजे. त्या करता मनाच्या संयमाची, निग्रहाची अत्यंत जरुरी आहे.***

पण अर्जुनासारखा योद्धा, त्याने सांगितले मनाचा निग्रह मी

करु शकत नाही.

***चंचल हि मन: कृष्ण प्रमाथि बलवद्दृढम् ।***
***तस्याहं निग्रहं मन्ये वायोरिव सुदुष्करम् ॥***

अर्जुनाने हात टेकले आहेत त्या मनापुढे. केवढा ईश्वर भक्त होता अर्जुन ! नामस्मरण अखंड चाललेलं आहे. ***अर्जुन निजला म्हणजे त्याच्या केसातून ''कृष्ण कृष्ण'' असे ऐकू यायचे म्हणे. अखंड नामस्मरण आहे. गुरुभक्तीही तशीच आहे.***

द्रोणाचार्यांची भक्ती केली म्हणून सगळी अस्त्रविद्याही द्रोणाचार्यांनी त्याला देऊन टाकली. आपल्या मुलालाही त्यांनी दिली नाही. अश्वत्थाम्यापेक्षाही जास्त आणखी प्रबल अर्जुन होता. द्रोणाचार्यांच्या मनाला पूर्ण समाधान आहे. समोर द्रोणाचार्य युद्धाला आल्यानंतर आरंभाला पायाजवळ दोन बाण मारायचे. सोडायचा फक्त हळूच. लागायचे नाहीत. म्हणजे नमस्कार करायचा त्या रुपाने. आणि मग युद्धं.

युद्धाच्या वेळेलासुद्धा मनामध्ये काही मत्सर, द्वेष नाहीये. आलेत. प्रसंग आलेला आहे. त्या बाजूला आहेत आपले गुरू महाराज आणि युद्धाला आलेले आहेत. म्हणून करायचं युद्धं. पण सगळा संयम पाळून करायचं आहे.

तर असा एवढा मोठा अर्जुन असून त्याने सांगितलं की -- 'चंचलं हि मन: कृष्ण'. मन अत्यंत बलवान आहे. त्याचा निग्रह करणं म्हणजे अतिशय अशक्य वाटतंय मला. ''वायोरिव सुदुष्करम्'' वाऱ्याला जसं बांधून ठेवणं अशक्य आहे त्याप्रमाणे मनाला आणखी बांधून ठेवणं, स्वस्थ बशिवणं हे अशक्य आहे. मग भगवंतांनी त्याला

उपाय सांगितला. मनाचा निग्रह सुद्धा होऊ शकतो म्हणाले --

*अभ्यासेन तु कौन्तेय वैराग्येण च गृह्यते ।*

*मनाच्या निग्रहाचा एक अभ्यास पाहिजे. आणखी वैराग्य ज्याला म्हणतात, विषयाकडे धावणारे जे मन आहे त्याला थांबविता आले पाहिजे, म्हणजे विषयाची तृष्णा हा एक मोठा दोष आहे मनाचा, तो कमी केला पाहिजे. म्हणजे आपोआप मन स्थिर होतं. एकाग्रता उत्पन्न होते. ध्यान करण्याची भूमिका त्या मनाची तयार होते आहे. मनाची एकाग्रता असल्याशिवाय ध्यान होऊ शकत नाही. एकाग्रता भूमिकेवर मन गेलं म्हणजे मग ध्यानाचा अभ्यास सुरु होतो. निरोध करणं किंवा एकाग्रता करणं. निरोध म्हणजे कोणतीही वृत्ती नाही. सगळ्या वृत्ती शांत होणं. हा एक प्रकार आहे.*

*आणि एकाग्रता म्हणजे एकाच ठिकाणी मन हे स्थिर होऊन राहाणं. ज्याला स्थिर होण्याचं कधीही माहिती नाही. चंचल मन आहे म्हणतात, अतिशय. त्याला स्थिर करता येतं म्हणतात. एक अभ्यास, प्रयत्न चालू पाहिजेत. गीतेच्या सहाव्या अध्यायामध्ये सगळा अभ्यास सांगितला आहे.*

*तर विषयाकडे जे मन चाललेलं असते, विषयापासून आपल्याला सुख मिळेल ही जी एक विचारसरणी आपल्या मनामध्ये दृढ झाली आहे, अनेक जन्माचे ते विचार आहेत. त्यामुळे धन पाहिजे आणि सुखाची सामग्री म्हणून जी ठरविलेली आहे, आपण ती सामग्री जमविली पाहिजे. त्याच्याकरता धन पाहिजे. याच विचारामध्ये मन गुंतून गेल्यामुळे मनाचा निग्रह होऊ*

*शकत नाही.*

*मनाचा निग्रह झाल्याशिवाय धर्माचरण होऊ शकत नाही. सुखाकडेच सारखं लक्ष असतं. धन पाहिजे. सुखाचे साधन धन आहे. ते मिळविण्याकरता जर प्रयत्न सुरु झाला तर धर्माधर्माचा विचार कसा राहाणार मनामध्ये? जास्तीत जास्त धनाचा संग्रह करायचा हाच विचार मनामध्ये असल्यामुळे मनाचा निग्रह नाही. मन सारखं त्या विषयाकडे धावते आहे. सर्व सुख साधनांचा संग्रह केल्यानंतर आपण सुखी होतो अशी समजूत आहे. त्यामुळे सुख साधनं सगळी पाहिजेत. त्याला धन पाहिजे.*

*आणि धनाचा विचार मनामध्ये असल्यानंतर काही धर्माकडे लक्ष लागत नाही. जितकं मिळवता येईल तितकं धन मिळवायचं. नीती अनीतीचा हा विचार मनामध्ये येतंच नाही. आणि त्या वेळेला मन हे अतिशय उद्दाम बनून गेलेलं असतं. सत्ता मिळाली आणि त्या सत्तेचा उपयोग धन मिळवण्याकरता करायचं ठरलं. त्यावेळेला मनातले विकार -- औद्धत्य, अहंकार हा कमी कमी होत नाही. जास्ती जास्ती वाढत जातो. आपल्या सत्तेचा उपयोग धनाचा संग्रह करुन घेण्याकरता करायचा. मनामध्ये औद्धत्य, अतिशय अहंकार उत्पन्न झाल्यावर ईश्वर भजन किंवा धर्माचरण हे होऊ शकत नाही. मनाचा निग्रह होऊ शकत नाही.*

*अनेक विषयांच्या वासना ह्या वाढत जाताहेत. त्या थांबत नाहीत. त्यामुळे मनही आपलं अनावर होत आहे. अहंकारही वाढतो आहे.*

म्हणून शंकराचार्य महाराजांनी विश्व संरक्षक भगवान विष्णूंची

प्रार्थना केली. ज्ञानेश्वर महाराजांनी त्या प्रमाणे पसायदान मागितलं तसं शंकराचार्यांचे हे पसायदान आहे -

***अविनय अपनय विष्णो***
***दमय मन शमय विषय मृगतृष्णा***
***भूत दयां विस्तारय***
***तारय संसारसागर सुखो ।***

संसार सागरातून तरुन जायचं आहे. संसार काही सामान्य नाहीये. सागरा सारखा पसरलेला आहे. एका जन्माचा नाहीये. अनेक जन्म चालू आहे. किती जन्म झाले. किती येणारेत. काही पत्ता नाही. वासना म्हणून बीज आहे. अनंत वासना मनामध्ये आहेत. ह्या जन्मामध्ये त्या वासनांची पूर्ती, ह्या वासना आणखी तृप्त होतील असं शक्य नाही. वाढतच असतात सारख्या. शेतामध्ये हरळी येतात, पुष्कळ गवत उगवलेलं असतं. उन्हाळ्यामध्ये नांगरुन टाकतात जमीन. सबंध गवत गेल असं वाटतं आपल्याला. आता गवत राहीलं नाही, धान्य चांगलं उत्तम होईल. मध्ये गवत वगैरे काही येणार नाही. सगळी जमीन नांगरुन टाकल्यामुळे गवत येणार नाही असं जरी वाटलं तरी एक पाऊस पडल्यावर पुन्हा ती हरळी उगवते. ती कांही कायमची गेलेली नसते.

तसं मनुष्य जन्म म्हणजे संसार संपला असं नाहीये. ते वासनेचं बीज जो पर्यंत आहे तो पर्यंत संसाररुपी हरळी म्हणा, धान्य म्हणा जास्ती जास्ती वाढत आहे. चांगले गुणही वाढतील. पण त्यात अहंकार त्यांच्या जवळ असणार. रावणाजवळ चांगले गुणही होते. उत्तम वेदाभ्यास त्याने केलेला होता. उत्तम गाणारा होता. चांगल्या

विद्या, कला ह्या त्याच्याजवळ होत्या. परंतु अविनय मोठा.

***अविनय अपनय विष्णो ।***

***जे खळांची व्यंकटी सांडो ।***

पहिली प्रार्थना ती आहे. ज्ञानेश्वर महाराज आणि आचार्य महाराज दोघांनीही ही प्रार्थना प्रथम केली आहे.

हा जो मनामध्ये ***अविनय*** उत्पन्न झालेला आहे. गर्विष्ठपणा अहंकार वगैरे त्यामुळे लोकांचा आणखी पाणउतारा होतो. मानहानी आपण करतो. लोकांचा उपमर्द करतो. तो मनातला अविनय दूर झाला पाहिजे. ही पहिली प्रार्थना आहे.

आणि तो जितका जितका कमी होईल तितकी ''दमन मन'' ही दुसरी प्रार्थना नंतर केली आहे. ***मनाचं दमन*** झालं पाहिजे. मनामध्ये ज्या अनेक वासना उत्पन्न होतात.

विषय मृगतृष्णां शमय -- तिसरी प्रार्थना आहे. विषय ही मृगतृष्णा आहे. मृगजल आहे, म्हणाले. पण हरिणाला ते मृगजल वाटत नाही. हरिणाला तहान लागलेली आहे. समोर आणखी दिसतंय पाण्यासारखं. सूर्य किरणांवरच पाण्याचा भास होतो आहे. आणि तो हरिण धावतो आहे. जिथं पाणी दिसत नाही तिथपर्यंत गेल्यानंतर तिथून तितकंच लांब तसंच पाणी दिसायला लागलं. किती धावणार तरी किती?

***त्याप्रमाणे विषयाच्या मागे जी धाव चाललेली आहे आपल्या मनाची, त्याच्यात सुख आहे. ती काही थांबवता येत नाही. किती मिळालं म्हणजे सुख मिळेल ते काही सांगता येत नाही. जास्ती जास्ती अशी तृष्णा ही वाढत जात आहे. त्यामुळे अमुक इतका***

*विषय संग्रह मिळाला. विषयाचा स्वीकार आपण केला म्हणजे सगळे भोग मिळाले, म्हणजे सगळं सुख मिळालं आता काही याच्या पुढं नाही असं काहीही सांगता येणार नाही. जास्ती जास्ती वासना वाढत जाताहेत.*

म्हणून ''विषय मृगतृष्णां शमय'' ही प्रार्थना केलेली आहे. विषयापासून आपण सुखी होऊ ही समजूत गेली पाहिजे. गाढ झोप लागली असता किती आनंद असतो. त्यासाठी कोणी झोप येण्याकरता औषध देतात. त्याने दु:ख विसरावं त्या रोग्याचं. त्याला झोप लागावी म्हणून औषध आहे. म्हणजे झोपेत आनंद आहे. एकदम कोणी गाढ झोपेतून उठवल्याबरोबर त्याला राग येतो. किती आनंदात होतो. कशाला उठवलंस म्हणतो, रागावतो.

*हा आनंद किंवा हे जे सुख मिळतं आपल्याला झोपेत त्या वेळी व्यवहारात सुखाची साधनं आपण जी ठरवली आहेत त्यापैकी कोणतं सुखाचं साधन तिथं आहे? धन नाही, सत्ता नाही. कांही याला कल्पनाच नाही. गाढ झोप लागली. सगळं विसरुन गेला. शरीरही विसरुन गेला. ज्या इन्द्रियांनी आणखी विषयांचं सुख उपभोगायचं ती इन्द्रियही सगळी त्या वेळेला विलीन झालेली आहेत. कांही इन्द्रियांचा संबंध नाही. मनही निर्विकार झालं आहे. तर एकही व्यावहारीक सुखाचे साधन तिथं नसतांना हा आनंद कोणता आहे? तो आत्माच आनंदरुप आहे, मुळात. पण आपलंच स्वरुप तो विसरला आणि बाहेर विषयामध्ये सुख आहे, आनंद आहे अशा समजूतीने तो आणखी वागतो आहे. हा प्रतिबंध दूर झाला पाहिजे. आपण काही करु शकत नाही या करता*

***ईश्वराजवळ प्रार्थना केली. ईश्वराची जर इच्छाशक्ती असेल तर त्या इच्छा शक्तीने हे कार्य होईल.***

पुन्हा शेवटची प्रार्थना आहे. 'भूतदयां विस्तारे' आचार्य महाराज ही प्रार्थना करताहेत. ***सर्वांच्या करता ही प्रार्थना आहे. सर्वही प्राणीमात्रां विषयी दया उत्पन्न झाली पाहिजे. कोणाचंही दु:ख दृष्टीस पडलं तरी वाईट वाटलं पाहिजे.*** स्वत:ला दु:ख झाल्यानंतर केव्हा दु:ख जाईल, काय याचा प्रतिकार कसा करायचा, कोण मला भेटेल, ही सारखी धडपड चाललेली आहे. त्याप्रमाणे मनाची तयारी दुसऱ्याला दु:ख झालेलं असताना ते दु:ख दूर करण्याकरता आपल्या स्वत:प्रमाणे जर झाली तर ही एक देवाजवळ प्रार्थना आहे.

मोठा गुण आहे आणि हा देवानेच द्यावा. ''भूतदयां विस्तारे'' ''भूता परस्परे पडो मैत्र जीवाचे'' ज्ञानेश्वरांच्या पसायदानामध्ये हीच प्रार्थना आहे. ***सर्वांच्या मनामध्ये एकमेकांबद्दल मैत्री भावना, प्रेम भावना, दया भावना ही निर्माण झाली पाहिजे.*** ''एकमेका सहाय्य करु'' ही वृत्ती निर्माण झाली पाहिजे. ते गुण आहेत. वैयक्तिक आणखी सामुदायिक राष्ट्रीय सुख ज्याला म्हणतात त्या राष्ट्रोन्नतीला, व्यक्तीच्या उन्नतीला, सगळ्यांना या गुणांची जरुरी आहे.

आणि हे गुण मिळवण्याचा प्रयत्न पांडवांनी केला. ईश्वरमान्य गुण आहेत. ईश्वराचा प्रसाद त्यामुळे त्यांच्यावर झालेला आहे. अन्नदान करणारी द्रौपदी जेवत नव्हती. सूर्यनारायणांनी ते पात्र देतांना धर्मराजांना सांगितले, याच्यातून वाटेल तितकं अन्न मिळेल पण द्रौपदीचं जेवण झालं की अन्न बंद होईल. जबाबदारी आता द्रौपदीवर

आलेली आहे. आपल्याला भूक लागली आणि आपण जेवण केलं तर त्या दिवशी अन्न नाही. दुसरे दिवशी सूर्योदयानंतर मिळेल. पण मध्ये कोणी आले तर?

त्या दुर्वास ऋषींनी त्याच वेळेला गाठलं त्यांना. दुर्योधनाने मुद्दाम दुर्वास ऋषींना पाठवून दिलेलं आहे. द्रौपदीचं जेवण आटोपलेलं. अशा वेळेला ते ऋषी, त्यांची शिष्य मंडळी आली परंतु त्या द्रौपदीनं मनाचं दमन करणं, विषयांची जी काही धाव आहे, विषय वासना त्या कमी करणं, ते देवाजवळ मागून घेतलं. तसा प्रयत्न केला. म्हणून ईश्वराचा प्रसाद इतका तिच्यावरती झाला होता की मध्यरात्री तिने बोल्यावल्या बरोबर गोपालकृष्णांनी येऊन त्या संकटातून त्यांना मुक्त केलं.

हे जे मनोबल आहे ते मनोबल वाढवण्याकरता त्यांनी प्रयत्न केला. आणि त्या मनाचं बल हे निग्रहाने, निरोधाने, संयमाने उत्पन्न होतं. आपल्याला वाटतं एकादशी आलेली आहे. काही निर्जला एकादशी म्हणून लिहीली असेल पंचांगामध्ये. आणि तशी निग्रही माणसे असतात. पाणीसुद्धा घ्यायचं नाही. तीर्थ फक्त घ्यायचं. खाण्याची वेळ झाली, भूक लागली. चहाची वेळ झाली, त्याची जरुरी आहे असं वाटतं आपल्याला. परंतु तपश्चर्या करणारे जे महात्मे आहेत त्यांनी मनाची तयारी अशीच केलेली आहे. काही मिळणार नाही. म्हणजे हे पाहिजे ते पाहिजे अशी जी संवय मनाला सारखी लागलेली आहे ती सवय बंद करण्याकरता काही घ्यायचं नाही. जरुरी नाही. त्यामुळे मनातल्या त्या वासनाच कमी कमी होऊन गेल्या. ***कष्ट आरंभाला झाले परंतु सगळ्या वासना काही राहिल्या नाहीत.***

*ही ईश्वराची कृपा आहे.*

*ईश्वराच्या कृपेशिवाय निग्रह होऊ शकत नाही. मनाचा निग्रह साधत नाहीये आणि तो अहंकार दूर होत नाही. विषयांच्या वासना कमी कमी होत नाहीयेत. आणि हे सगळं झालं तर भूतदया ही आपोआप होत आहे. दुसऱ्याला दु:ख असलं तरी हरकत नाही, आपलं तेवढं दु:ख जाऊ देत, असाच प्रयत्न करतो आपण. दुसऱ्याकडे आपलं लक्ष नाही. तर स्वत:चं दु:ख सहन करून दुसऱ्याची दु:ख दूर करण्याचा प्रयत्न करणारे आणखी महापुरुष असतात, होत असतात.*

*तर याप्रमाणे वागणारे जे आहेत, आपल्या शरीराचा निग्रह, मनाचा निग्रह आणि वाणीचा निग्रह हा सगळा साध्य झाला पाहिजे. निदान तो व्हावा अशी इच्छा तरी पाहिजे. तळमळ पाहिजे म्हणजे ईश्वराच्या कृपेने ते साध्य होऊ शकतं. मनाला, वाणीला, शरीराला आवरणं जर सोडून दिलं आपण, त्यात आपल्याला काही दोष दिसले नाहीत आपल्याला आपण वागतो हे सगळं बरोबरच आहे. आपण काही चूक करत नाही अशीच समजूत जर आपली वाढत गेली तर सुधारणा होणार तरी कशी?*

म्हणून पांडव आणि कौरव यांच्यामध्ये जे अंतर त्यांनी दाखवलेलं आहे, व्यासांनी महाभारत ग्रंथ लिहून या करता पुढं केलेलं आहे. *काया, वाचा, मन यांचा निग्रह करणारे पांडव दु:ख आलं तरी त्या अवस्थेतही त्यांनी याचा अभ्यास कायम ठेवला.* कौरवांचा तो अभ्यास नाहीये. जास्तीत जास्त हे सुख मिळालं पाहिजे. आपण कपटानं राज्य घेतलं हे त्यांच्या लक्षातसुद्धा येत नाही. राज्य

आपल्याला मिळालं नं आता, ते कायमच टिकलं पाहिजे. म्हणून पांडवांनी जन्मभर वनामध्ये रहावं ही व्यवस्था त्यांनी करुन ठेवली होती. एक वर्षाचा अज्ञातवास त्यांच्या पदरात टाकला होता. ती अट घातली. त्यांना शोधून काढून पुन्हा त्यांना वनामध्ये धाडायचं.

***तर हे दोन प्रकारचे अभ्यास आहेत. दोन प्रकारच्या मानसिक वासना आहेत. एक दुर्वासना आहे एक सद्वासना आहे.*** पांडवांना दु:ख देण्याचा प्रयत्न कौरवांनी वनात पाठवून सुद्धा केलेला आहे. त्या घोषयात्रेच्या निमित्ताने आपल्या सगळ्या सैन्याला, बायकांना वगैरे घेऊन आपलं ऐश्वर्य दाखविण्याकरता दुर्योधन वगैरे गेले आणि तिथं त्या चित्रसेन गंधर्वाने त्यांचा पराजय करुन दुर्योधनाला कैद करुन चाललेला आहे. मग त्याचेच लोक धर्मराजाला शरण आले आणि म्हणाले, ''दुर्योधनाला गंधर्वांनी कैद केलेलं आहे. युद्ध झालेलं आहे. पराजय झालेला आहे. त्याला तेवढं सोडवा. त्याची सुटका करा.''

भीम त्यांना म्हणाला ''बरं झालं. आम्ही जे काम करणार होतो त्यांना कैद करण्याचं, त्यांचा पराजय करण्याचं. ते आपोआप गंधर्वांनी केलं, बरं झालं की.'' हे ऐकून धर्मराजांनी आणखी त्याला उपदेश केला. नीतिशास्त्राच्या दृष्टीने ही चूक आहे. आध्यात्मिक दृष्टीने ही फार मोठी चूक आहे. स्वत: तुम्हाला कैद केलं असतं तर कसं वाटलं असतं? दुर्योधनाला कैद करुन तो घेऊन चाललाय. दुर्योधन आपल्यापैकीच आहे, ही बुद्धी पाहिजे. भावांचे वैर असेल आपलं, ते आपलं आपण पाहून घेऊ. आपल्यामध्ये वैरभाव असताना आपण पांच आणि ते शंभर. पण तो दुसरा जर कोणी आलं तिऱ्हाईत आणि

तो आपल्या पैकी कुणाला त्रास देऊ लागला तर नीतीशास्त्र दृष्टीने दोघांनी मिळून त्याचा पराजय केला पाहिजे.

तेव्हां एकी पाहिजे. फूट असली तरी सुद्धा ती बंद केव्हा करायची हे सुद्धा त्यांनी शिकविलेलं आहे. हा तिसरा शत्रू आलेला आहे. तिसरा शत्रू आलेल्या वेळेला आपल्यामध्ये असलेला जो भेद आहे तो टाकून दिला पाहिजे. ती संवय पाहिजे. नंतर भांडत बसा तुम्ही. तीसरा आल्यानंतर भांडू नका. तो एकेकाचा पराजय करील. तुम्हालाही राज्य मिळणार नाही. भावालाही मिळणार नाही. तिसराच घेऊन जाईल. हा नीतिशास्त्राचा उपदेश आहे.

त्याच्याही पुढे आध्यात्मिक धर्म जो आहे त्या भूमिकेवर धर्मराज असल्यामुळे सर्वही भूतांच्याबद्दल त्यांची समदृष्टी राहिली. म्हणून ''भूता परस्परे पडो मैत्र जीवाचे'' हा उपदेश भीम, अर्जुनाला त्यांनी केला. आणि अर्जुनाने जाऊन त्या चित्रसेन गंधर्वाचा पराजय करुन दुर्योधनाला सोडवून आणलं आहे. म्हणजे वनामध्ये पांडव गेले असतानासुद्धा जास्ती त्यांना दु:खी करावं आपलं ऐश्वर्य दाखवून ही इच्छा करणारा दुर्योधन, साम्राज्य मिळाल्यानंतर सुद्धा त्याच्या मनाचं समाधान झालं नाही. हा प्रयत्न आहे. यांचं साम्राज्य गेलेलं असताना सुद्धा यांनी आपल्या मनावर ताबा ठेवलेला आहे. दुर्योधन सापडला, बरं झालं, त्याचं राज्य गेलं, त्याला घेऊन गेला. कांही इच्छा सुद्धा त्यांना उत्पन्न झाली नाही. हा एक दोघांच्या वृत्तीचा फरक आहे.

काय प्रयत्न करायचा मनुष्याने हे चांगलं कळत नाही, आपल्याला. म्हणून दुर्योधनासारखे जे आहेत कौरव. ह्यांना बाह्य सुख जे आहे, सत्ता मिळाली पाहिजे. धनधान्य, सगळी समृद्धी

आपल्या ताब्यात पाहिजे, हे आपलं सुख आहे असं समजणारे कौरव होते. पांडव तसा विचार करत नव्हते.

***मुख्य सुख जे आहे ते म्हणजे अहंकार नाहीसा झाला पाहिजे, मनाचा निग्रह साध्य झाला पाहिजे. विषय वासना कमी कमी झाल्या पाहिजेत आणि सर्वांच्या बद्दल मनामध्ये दयावृत्ती निर्माण झाली पाहिजे. हा अभ्यास करुन सुख मिळवावं आणि ते मिळते.***

पांडवांना मिळालं. कारण तेरा वर्ष वनवास भोगून जरी पांडव आले तरी युद्धाची त्यांना इच्छा नव्हती. धर्मराजाने मुद्दाम श्रीकृष्णांना दुर्योधनाकडे पाठवलेलं आहे संधी करण्याकरता. युद्ध नको. दुर्योधनाने कबूल केलं तर आमचं अर्ध राज्य द्या. त्यांचं अर्ध राज्य ते घेऊ देत. ते कबूल नसलं तर आम्हाला एकेकाला एकेक गांव जरी दिलं तरी हरकत नाही. पांच गांवांमध्ये आम्ही समाधान मानू. इतकी त्यांनी आणखी तडजोड केली. त्या वनवासातून मोकळे झालेलं आहेत. तरी सुद्धा त्यांनी युद्ध करावं आणि राज्य मिळवावं अशी दुर्योधनाची इच्छा आहे.

भूतदयां विस्तारे -- आचार्य सांगताहेत. तिकडं त्यांची दृष्टी आहे. केवढा संहार होईल. कौरव पांडवांचे ते युद्ध झाल्यानंतर सबंध तरुण पिढी नामशेष झाली. पानिपतच्या लढाईनंतर जशी स्थिती झाली तशी स्थिती झाली. संहार झाला. त्याचा विचार धर्मराजाने केला. दया पाहिजे. तो जरी चुकीचा वागला तरीसुद्धा आपण तसं वागणं बरोबर नाही. म्हणून गोपालकृष्णांनाच त्यांनी मध्यस्थी करायला पाठवलं आहे. तरीसुद्धा दुर्योधन त्याला कबूल झाला नाही.

युद्धाशिवाय कांहीही मिळणार नाही. अविनय आहे. त्या अविनयामुळे नुकसान झालं आहे. उद्धटपणा. कृष्णांनासुद्धा त्याने सांगितलं, काही मिळणार नाही.

कृष्णांना कैद करण्याचा त्याने प्रयत्न केला. कृष्ण हे दूत म्हणून आलेले आहेत. राजधर्माप्रमाणे, नीतीशास्त्राप्रमाणे दूताला कैद करायचं नाही. पण काय बाह्य सुखाकडे बुद्धी गेली, मन गेल्यानंतर बरं वाईट हा विचार करण्याची मनाची पात्रता राहात नाही. कृष्णाला कैद करुन आपण ठेवू म्हणजे झालं. पांडवांच्या बाजूला कृष्ण कांही सहाय्य करायला नाही. अपराध पांडवांचा आहे ही बुद्धी आहे. कैद करु शकला नाही तो. त्यांनी आपलं ते तेज दाखवलं आणि निघून आले.

तर अविनय अपनय .... दुःखमय संसार आहे ना ! ''सुख पहाता जवा पाडे, दुःख पर्वता एवढे'' ते विचार करणारे महात्मे असा सिद्धांत मांडतात. सुख नाही असं म्हणत नाहीत. पण थोडं आहे. दुःख जास्ती आहे. उत्तम आणखी पक्वान्न आहे. पण त्यात विष थोडं पडलेलं आहे. उत्तम बासुंदी आहे पण पाल पडली एवढंच. ते समजल्यानंतर कोण घेईल. तसं ते दाखवतात. अगदी दुःख नाही आणि केवळ सुख आहे असा कुणाचा अनुभव आहे? ''जगी सर्व सुखी असा कोण आहे?'' म्हणून आणखी त्यांनी सवाल केलेला आहे, मुद्दाम. तिथंही त्यांनी उत्तर दिलेलं आहे, ''विचारी मना तूंची शोधून पाहे'' पण कोण सुखी आहे? ***विचारी जो आहे तो सुखी आहे. विकारी जो आहे त्याला सुख मिळणं कठीण आहे. तो सगळा अभिमान आहे.*** मी विजयी होणार आहे असं शेवटपर्यंत दुर्योधन समजत होता. भीष्माचार्य पडले दहा दिवसांनी. तरी अजून द्रोणाचार्य

आहेत की. आपल्या बाजूला काय कमी लोकं आहेत. पाच दिवसांनी द्रोणाचार्यही गेले. कर्ण आहे अजून. मी विजय देणार नाही. कर्ण दोन दिवसांत गेला. शल्य अर्धा दिवस राहिला, तोही गेला.शेवटपर्यंत मी मी विजयी होणार आहे हा अहंकार मनामध्ये आहे. जरी दु:ख येऊन कोसळली तरीसुद्धा आपल्या अहंकाराने तो सांगतोय की नाही, हेही दु:ख मी दूर करीन. त्याचा अहंकार इतका होती की शेवटी अठराव्या दिवशी भीम दुर्योधनाचं गदायुद्ध झालं. आणि मांडीवर गदा मारली जोराने त्या भीमाने. तो खाली पडला. सगळं संपलेलं आहे. आता सगळे भाऊ गेले. सगळं सैन्य गेले, सेनापती गेले. आपणही पडला तरी अहंकार कमी नाही. त्याने धर्मराजाला सांगितले, तुम्ही आता राज्य करा. तुमचेही गेले लोक. आमचेही गेले लोक, कोण आहे? तुम्हाला कसलं राज्याचं सुख मिळणार? लढाई करता करता मला मृत्यु आला. मी आता स्वर्गाला निघालो. तुम्ही इथंच बसा आता. रडत बसा, हे गेले, ते गेले. म्हणजे शेवटी सुद्धा त्याने अशी अहंकाराची भाषा केली.

तर विचार नाहीये. विचार नसल्यामुळे ते सुख मिळत नाही. आणि विकार ज्या ठिकाणी आहे त्या ठिकाणी अर्धसुद्धा सुख हे असलं तरी सुद्धा त्याने मनाचं समाधान मिळत नाही. ***हा उपदेश आचार्य महाराजांनी मुद्दाम केलेला आहे. संसारामध्ये दु:ख जास्ती आहे की सुख जास्ती आहे? सुखाकडे आपलं लक्ष कमी असलं तरी थोडं जरी सुख मिळालं तरी जास्त जास्त समजून आपण जास्तीत जास्त प्रयत्न करतो. मनाच्या विरुद्ध पुष्कळ गोष्टी घडून येतात. तरीसुद्धा तिकडे आपलं लक्ष नाहीये. या***

***करता विचार चांगला उत्पन्न झाला पाहिजे. आणखी मनाची चांगली तयारी झाली पाहिजे. जरी क्रोधादिक विकार उत्पन्न झाले तरी सुद्धा ते आवरण्याची शक्ती त्या मनाच्या जवळ उत्पन्न झाली पाहिजे. विकारी मन होतं, विचारीही मन बनलं पाहिजे. तशी शक्ती मनामध्ये अभ्यासाने जर उत्पन्न झाली तर ईश्वराच्या कृपेने त्याला कुठेही सुख आहे. सर्वांची दु:ख तो दूर करण्याचा प्रयत्न करतो आहे. आपल्या सुखदु:खाची जशी आपल्याला काळजी आहे त्याप्रमाणे दुसऱ्याच्या सुखदु:खाचीही काळजी त्याला उत्पन्न होते. आणि सर्वही जगाच्या उपयोगी तो पडतो आहे. ईश्वर कृपेने हे अशा प्रकारचे महात्मे दुसऱ्यांची दु:ख निवारण करू शकतात. त्यांच्याजवळ तशी शक्ती, सामर्थ्य आहे. नुसती बोलण्यापुरती भूतदया नाहीये. त्यांच्या मनामध्ये दया उत्पन्न झाल्यावर ते आपल्या शक्तीने ईश्वराच्या कृपेने दुसऱ्यांची दु:ख दूर करू शकतात. ही शक्ती त्यांनी मिळवलेली असते. त्या करता हा एक प्रयत्न आहे.***

ती दैवी संपत्ती आपल्याला मिळावी या करता पांडवांचा प्रयत्न जन्मभर चाललेला होता. कौरवांचं मात्र दैवी संपत्तीकडे लक्ष नाहीये. कुणीकडून तरी आपल्याकडे सत्ता राहीली पाहिजे. राज्य आपल्या ताब्यात राहीलं पाहिजे. मग कितीही लोक जावोत. जिवंत राहोत किंवा मरोत. आसुरी संपत्ती. स्वत:च्या भोगाकडे आणखी नेहमी लक्ष असणं. आपल्याला सुखभोग मिळाला पाहिजे. आपण सुरक्षित राहीलं पाहिजे. दुसरे गेले तरी हरकत नाही ही असुरी वृत्ती आहे.

'सर्वेपि सुखिन: सन्तु। सर्वे सन्तु निरामय:' ही जी वृत्ती आहे

ही दैवी प्रकृती आहे. सामान्यही सुखी झाले पाहिजेत. हा प्रयत्न करणारा महात्मा तो स्वत: सुद्धा सुखी असू शकतो. सर्वांमध्ये त्याचा अंतर्भाव होतो. सर्व आरोग्य संपन्न राहोत, कोणालाही दु:ख राहू नये असा प्रयत्न करण्याची बुद्धी आणि शक्ती ज्यांना मिळालेली आहे ते महात्मे सर्व जगाचं कल्याण करु शकतात. जगाचं कल्याण संतांच्यामुळे, विभूतींच्यामुळे होतं. सर्वही जीव परमात्म्याचे अंश आहेत. 'ममैवंशो जीवलोके जीवभूत: सनातन: ।' तरी अंश निराळे आणि विभूती निराळ्या. 'जगाच्या कल्याणा संतांच्या विभूती' म्हणतात.

***ईश्वराच्या शक्तीचा विशेष रुपाने आविर्भाव ज्या ठिकाणी झालेले आहेत त्या सगळ्या विभूती आहेत आणि ते विभूती म्हणून असलेले संत, महात्मे*** जगाच्या कल्याणाकरता प्रयत्न करत असतात. त्यांचा तो स्थायीभावच झालेला आहे ना ! ते काही दाखवण्याकरता प्रयत्न करतात असे नाही. परोपकाराकडे त्यांचे लक्ष असतं. लोकांना सांगण्याकरता ते काही करत नाहीत. त्यांची मनोवृत्तीच तशी राहाते.

एक बाई रानातून लाकडाचा भारा घेऊन आली. तुकाराम महाराजांनी पाहिल्यावर तिला म्हणाले, ''तूं दमलेली आहेस, मी घेतो थोडा वेळ.'' आता गावात राहाणाऱ्या लोकांनी हे पाहिल्यावर कांही जरी म्हटलं तरी तिकडे लक्ष नाही. तुकाराम बुवा इतके चांगले आहेत, महात्मा आहेत, अभंग करतात, कीर्तन करतात पण त्या बाईचं ते दु:ख पाहून तो भारा घेतला आणि चल , म्हणाले.

**अशी मनाची वृत्ती बनवण्याकरता मनुष्य जन्म आहे. कोणती वृत्ती बनवायची, दोष वाढवायचे कि गुण वाढवायचे, हे**

**समजलं पाहिजे. कोणते दोष मनामध्ये आहेत, कोणते गुण आहेत. किती कमी आहेत, किती जास्त आहेत हे सगळं आपल्या मनाचं निरीक्षण करुन ते दोष घालवण्याकरता, सद्गुण संपन्न मन करण्याकरता, मन:शुद्धी करता ते संत महात्मे प्रयत्न करतात. त्यांच्यावर ईश्वराचा प्रसाद होतो. ईश्वराचं सहाय्य त्यांना होतं. आणि जरी दु:खं आली तरीसुद्धा त्यात ते समाधानाने राहू शकतात.**

तेच महाभारतामध्ये आहे. धर्माने वागणं. ***न्यायाने वागणारा सुखी होतो. रामायणाचं हेच सार आहे.*** न्यायाने वागणाऱ्याला, धर्मशील महात्म्याला पशु-पक्षी सुद्धा सहाय्य करतात. वानरांनी सुद्धा रामरायांना सहाय्य केलं. दोघं होते बंधू. रामलक्ष्मण. सीतेला घेऊन गेला रावण. त्यावळेला त्यांच्या जवळ काय होतं? कोणती अनुकूलता होती?

अमूक एक मोठा आपला पक्ष आहे, त्या पक्षात मी आहे, त्या पक्षाचा मी अध्यक्ष आहे, इतके लोक माझे अनुयायी आहेत इतर सैन्य आहे वगैरे काही नाही. तशा स्थितीचं वाल्मिकींनी वर्णन केलंय. प्रत्यक्ष मूर्तिमंत धर्म म्हणजे राम आहे. पुढे सीतेला आणल्यानंतर रावणाने त्या कुंभकर्णाला जागे केलं. कुंभकर्णाला काय संकट आलयं याची कल्पना आली. कुंभकर्ण म्हणाला, ''तुला वाटेल ते रुप धारण करता येतं रावणा. तू रामाचं रुप धारण करुन सीतेकडे का गेला नाहीस? म्हणजे सीता आपोआप तुला वश झाली असती.''

तो रावण म्हणाला, ''मी रामाचं स्वरुप धारण केल्यावर माझा रावणपणा सगळा जाईल कि ! मी सीता देऊनच टाकणार पुन्हा.

असं रामाचं स्वरुप घेतलं तर प्रत्यक्ष मूर्तिमंत धर्मच आहे राम. मी रामाचं स्वरूप धारण करणार नाही.''

रामरायांना रावणासारख्या मोठ्या शत्रूची भीती नाहीये. दैवी संपत्ती आहे रामचंद्रांकडे. आपण एकटे आहोत, आपल्याला कुणाचं सहाय्य नाही, कांही नाही. मारुतीराय एकटेच होते. गेले लंकेमध्ये. सगळ्या लंकेचा शोध घेतला. सीतेला भेटले. आश्वासन दिलेलं आहे. आपली एकट्याची शक्ती रावणालाही दाखवली. लंका दहन करुन आले. संख्याबळ हे केवळ बळ नाहीये. मनोबल मुख्य आहे. ईश्वराची शक्ती. ईश्वराला प्रसन्न करणारे जे गुण आहेत ते जर मनामध्ये उत्पन्न झाले तर ती मोठी शक्ती आहे. शेवटी त्यांनी सांगितलं, न्यायाने वागणाऱ्याला, धर्ममार्गाने जाणाऱ्याला पशु-पक्षी, सगळे वानर मिळाले, सुग्रीव राजा मिळाला. सगळं सहाय्य झालं आहे.

उलट धर्ममार्ग ज्या रावणाने सोडला आहे त्याने पुष्कळ शक्ती मिळवली. सगळे देव काय, गंधर्व काय सगळे ताब्यात आहेत ना ! केवढी सत्ता मिळाली. त्याची गणनाच नाही. मनुष्यापासून मला मरण येऊ नये हे त्याने मागितलंच नाही देवाजवळ. देव, गंधर्व वगैरे सगळ्या ज्या मोठ्या शक्ती आहेत, त्या सर्वांना मी अजिंक्य असा झालो पाहिजे. मनुष्य माझं काय करणार आहे? म्हणून मनुष्य रुपाने यावं लागलं देवाला असा इतका समर्थ रावण असतानासुद्धा सत्ता पाहिजे. संपत्ती पाहिजे. पुष्पक विमान आहे. सगळं आहे. ते भावाकडूनच बळजबरीने आणलं होतं. कुबेराला दिलं होतं ब्रह्मदेवाने. असा मार्ग ज्याने सोडला आहे. त्या रावणाला रामायणकार सांगतात, त्याचा सख्खा भाऊसुद्धा त्याला सोडून जातो. तो सुद्धा त्याच्या सहाय्याला

येत नाही. बिभिषण निघून गेला. प्रयत्न केला त्याने आरंभाला. रावणाची समजूत करण्याचा प्रयत्न केला. ऐकलं नाही.

तर हे सगळं मुख्य सार आहे. ***मनोबल मुख्य आहे. म्हणून समर्थांनी मनाला उपदेश केला. मनाची सुधारणा, बुद्धीची सुधारणा झाली पाहिजे. भारतीय संस्कृतीमध्ये बुद्धीबल वाढविण्याकरता जास्त प्रयत्न केलेला आहे. सगळ्या मानवांचा जन्म हा त्या करता आहे. आपल्या मनाचं, बुद्धीचं सामर्थ्य जास्ती वाढलं पाहिजे. समाजाची कामं, राष्ट्राची कामं करायची असं नाही. जास्तीत जास्त लक्ष इकडे दिलं म्हणजे आपोआप सगळ्याविषयी परस्पर दया उत्पन्न होते. मग एकमेकांच्या सहाय्याला कोण जाणार नाही? एकमेकांवर प्रेम करण्यासाठी राष्ट्रपतींचा वटहुकूम काढून होईल का? सर्वांची मनं सुधारण्याची शक्ती शासनाजवळ नाहीये.***

***म्हणून धर्मशास्त्र ही ईश्वराची आज्ञा जी आहे त्याप्रमाणे वागणारे जे आहेत ते शेवटी सुखी होत आहेत. निर्भय होत आहेत. निर्दोष बुद्धी, मन ज्यांनी केलं तेच निर्भय होतात आणि लोकांना आदर्शभूत होतात. लोकांचं संरक्षण करु शकतात. हे सगळं आचार्य महाराजांनी मांडलेलं आहे म्हणून त्या भगवान विष्णू दत्तात्रेय जे आहेत त्यांच्या जवळ हीच प्रार्थना करायची आहे.***

**अविनय अपनय विष्णो ......**

**॥ अवधूत चिंतन श्रीगुरुदेव दत्त ॥**

## प.पू. कैवल्याश्रम स्वामीमहाराज़ पुण्यतिथी, आळंदी
## मंगळवार–२५.१०.१९९४

'सुहृद' या शब्दाचा अर्थ **आचार्य महाराजांनी** प्रत्युपकार निरपेक्षतया उपकारिणम् । असा केला आहे. ईश्वराचा जीवाने आपली पूजा करावी, आपल्यावर उपकार करावे, आपली सेवा करावी अशी कांही इच्छा नाही. ***कोणत्याही उपकाराची अपेक्षा नसतांना उपकार करणारा परमात्मा आहे.*** हा वात्सल्यभाव आहे. हे आहे भक्तवात्सल्य.

**वात्सल्य** शब्दाचे अर्थही शास्त्रकारांनी दोन प्रकारे केलेले आहेत. जे आपले आश्रित भक्त आहेत त्यांनी कितीही दोष केले तरी त्या दोघांना दोष म्हणून न समजता ते गुण आहेत असे समजणे हा एक वात्सल्य शब्दाचा अर्थ. हा जर अर्थ घेतला तर दोषेषु गुणत्व बुद्धीः । हा भ्रम होईल. म्हणून ती व्याख्या बदलली. ईश्वराला भ्रम कसा? आश्रित भक्त जो आहे त्याचे दोष परमेश्वराला दिसतच नाहीत. हे वात्सल्य भगवंताचे असल्यामुळे सर्व संतमहात्म्यांची प्रवृत्ती भक्ती मार्गाकडे झालेली आहे. कोणतेही दोष भगवंताच्या लक्षातच रहात नाहीत. इतका उपकारी भगवान आहे. कोणत्याही प्रत्युपकाराची त्याला अपेक्षा नाही. यामुळे भगवत् भक्तीकडे प्रवृत्ती आहे. या रुपाने भगवंताच्या स्वरुपाचे ज्ञान झाले म्हणजे शांती मिळते.

***ईश्वरस्वरुपाचे पूर्ण ज्ञान होण्याकरता म्हणून श्रवण, मनन, निदिध्यासन यांची आवश्यकता आहे. उपनिषद् भाष्य आहे. संतमहात्म्यांचे ग्रंथ आहेत. त्यांचं श्रवण, मनन, निदिध्यासन अखंड चालू राहीलं पाहिजे. त्या श्रवण, मनन, निदिध्यासनालाही साधनचतुष्ट्य संपत्ती आरंभालाच सांगितली आहे. त्याशिवाय***

***श्रवणाचा अधिकारी नाही.*** संन्यासाश्रम उपयुक्त आहे. कारण सर्व संगपरित्याग केलेला आहे. ममता सगळी संपलेली आहे. तर ही ममता त्याज्य झाल्यामुळे आता लक्ष्य म्हणजे केवळ आत्मानुसंधान व्हायला पाहिजे. ईश्वर दर्शन व्हावे ही उत्कंठा आहे. मुमुक्षा तीव्र आहे. आणि त्यामुळे तिकडे प्रवृत्ती झाल्यानंतर त्याचं लक्ष दुसरीकडे कुठेही नाही. त्यामध्येच तो नित्य निरंतर निमग्न असणार.

**साधन चतुष्ट्य संपत्ती**मध्ये शमाला प्राधान्य मानलेलं आहे. सदैव वासना त्याग. ***आचार्य महाराज म्हणतात, मनातल्या वासना कमी झाल्या पाहिजेत. निर्वासन मन ज्याचे झाले तो खरा अधिकारी आहे.*** त्यामध्येही भगवत् पूज्यपाद सांगतात, ''मनामध्ये कोणतीही वासना न रहाणं ही भूमिका तयार झाल्याशिवाय श्रवण नाही.'' ही भूमिका तयार होण्याकरता पूर्वांग, आणि उत्तरांग त्यांनी सांगितले आहे. तीव्र वैराग्य ज्याला म्हणतात ते पूर्वांग आहे. त्यात समाधी साधन. आपल्या समाधी साधन संपत्तीमध्ये उपरती म्हणून एक आहे. शास्त्रज्ञ उपरती शब्दाचे दोन अर्थ करतात. ***व्यवहारातलं लक्ष पूर्णपणे बाजूला झालं पाहिजे. काहीही व्यवहार मनामध्ये नाही.***

भागवतामध्ये एक कथा आलेली आहे. रहूगण राजाला जडभरत उपदेश करताहेत. राजांच्या शिपायांनी जडभरतांना धरुन आणलं. त्याच्या खांद्यावर पालखी दिली तरी मानापमान काही नाही. पण नंतर जडभरतांचं खरं ज्ञान किती आहे, केवढा ज्ञानी महात्मा आहे हे कळल्यानंतर तो रहूगण राजा त्यांना शरण आलेला आहे. आणि त्यांनीही राजाला उपदेश केला. त्यावेळी त्या रहूगण राजाने

एक प्रश्न विचारला आहे. ''व्यवहारापासून निवृत्त व्हायचे? संसार सोडून द्यायचे असे म्हणता पण संसार खोटा आहे असं कुठाय? संसार खराच आहे की ! कारण खोटा असेल तर सोडून द्यायचा. संसार असल्यावर संसार संबंध आहे त्यांनी उदाहरण दिलेलं आहे. पातेलं ठेवलेलं आहे चुलीवर. खाली लाकडं पेटलेली आहेत. पातेल्यामध्ये पाणी आहे. तर लाकडं पेटल्यानंतर ते पातेलं तापलं आणि पाणीही तापलं. त्यात तांदूळ घातल्यानंतर तांदूळही शिजून भात तयार झाला. दिसणं खरचं आहे की. त्याप्रमाणे देह, इंद्रिय, प्राण, स्थूल शरीर, सूक्ष्म शरीर सर्वांशी संबंध ठेवणारा आत्मा, त्याला संसार नाही. सुखदु:ख नाही, असं समजायचं कसं?

जडभरतांनी स्पष्टपणे उत्तर दिलेलं आहे. ''जे दृष्टीला स्पष्ट दिसतंय ते खरं आहे असे गृहित धरुन तूं प्रश्न विचारलेला आहेस. तू प्रश्न केलेला आहेस. त्यामुळेच तुला हा संसार खरासा वाटतो. तुला ज्ञान होणार नाहीये. तुझ्या मनामध्ये संसाराबद्दलची सत्यत्व बुद्धी जोपर्यंत आहे तोपर्यंत तुला ज्ञान होणार नाही. ***केवळ अध्ययनाने ज्ञान होत नाही. महात्मे जे आहेत. त्या महात्म्यांना शरण गेल्याशिवाय त्यांची कृपादृष्टी झाल्याशिवाय ज्ञान नाहीये म्हणाले.***

***तर या दृष्टीने उपरती शब्दाचा अर्थ पूर्ण व्यवहार निवृत्ती. हाही अर्थ गृहित आहे. किंवा उपरती म्हणजे संन्यास हाही अर्थ घेतलेला आहे त्यांनी.*** वैराग्य असल्याशिवाय संन्यास घ्यायचा नाहीये. तर तीव्र वैराग्य हे आणि पूर्वांग व शमसिद्धीला आणि दम सिद्धी वगैरे पुढची समाधानं, पुढची सगळी साधनं ही उत्तरांग म्हणून सांगितली. या सगळ्याही अंगाचा अभ्यास वैराग्यतापूर्ण अभ्यास

त्याचप्रमाणे दमादिकांचाही अभ्यास पाहिजे. निरंतर चालू ठेवला पाहिजे. ***एखाद्या वेळेला आपण इंद्रियांचा संयम केला म्हणजे संयम झाला असं समजून उपयोग नाही. पूर्ण आणि कोणत्याही स्थितीमध्ये संयम जाऊ देऊ नये. अशी स्थिती म्हणजे शेवटपर्यंत इंद्रिय निग्रहांचा अभ्यास पाहिजे. त्याचप्रमाणे वैराग्याचाही अभ्यास पाहिजे. त्याशिवाय ईश्वरदर्शनही पूर्ण होणार नाही. सर्व वासनांची विरक्ती ज्या अंत:करणातून झालेली आहे. असे शुद्ध जे अंत:करण आहे, कोणचीही वासना राहिलेली नाही, त्या अंत:करणामध्ये सच्चिदानंद परमात्म्याचं प्रतिबिंब प्रगट होत आहे. त्या अंत:करणानीच आणखी परमात्मा स्वरूपाचं ज्ञान होऊ शकतं.***


आत्मस्वरूपाचं ज्ञान प्रत्यक्ष झालं पाहिजे. अज्ञानाचं कार्य प्रत्यक्ष वर दिसतंय असं आम्ही समजतो तेव्हां प्रत्यक्ष दिसणाऱ्याला तसंच आणखी दिसलं पाहिजे, प्रत्यक्ष ज्ञान झाल्याशिवाय विरक्ती होणार नाही. तेव्हां प्रत्यक्ष ज्ञानाचे साधन हे इंद्रिय आहे. अशी एक भावना आहे. तेव्हां प्रत्यक्ष ज्ञान होण्याकरता शब्दांनी कसं प्रत्यक्ष ज्ञान होतं, शब्द हे सहकारी आहेत. त्यामुळे इंद्रियांनी आणखी प्रत्यक्ष ज्ञान म्हणजे मनाचे ज्ञान व्हायला पाहिजे, शुद्ध बुद्धी झाली पाहिजे. एकाग्र बुद्धी झाली पाहिजे. पूर्ण वासनारहित बुद्धी झाली पाहिजे. भगवान योगेश्वर **श्रीकृष्ण** परमात्मा समोर येऊन उभे राहिलेले आहेत. भीष्मांच्या निर्याणाची वेळ आहे. भीष्म अगदी शरशय्येवर निजून राहिलेले आहेत. केवढे विलक्षण धैर्य आहे। अंगामध्ये बाण रुतलेले आहेत, आणि तशा अवस्थेत पडून राहिलेले आहेत. श्रीकृष्णांनी आणखी धर्मराजाला सांगितलं, ''यांना विचारून घे.

जगामध्ये जे ज्ञान आहे ते यांच्याजवळ आहे. भीष्माचार्य पूर्ण ज्ञानी आहेत. जिज्ञासेला अनुसरुन सर्वही यांना तू विचार. ते तूला सगळं समजावून सांगतील. भगवंतांनी आणखी कृपा केली. भीष्माचार्यांच्या व्यथा दूर झाल्या. त्यांच्या आज्ञेनं. धर्मराजासारख्या धर्मज्ञाने त्यांना प्रश्न विचारले, आणि भीष्माचार्यांनी सर्व प्रश्नांची उत्तरे दिलेली आहेत. ***शास्त हे ज्ञान करुन देणारं आहे. शास्त्राने प्रत्यक्ष कार्य नाही. कृती नाही. कारक आहे. समजावून सांगणारं शास्त्र. समजल्यानंतर त्याप्रमाणे आचरण करणे हे आपल्यावर अवलंबून आहे.***


त्याप्रमाणे धर्माचरण करावं अशी इच्छा धर्मराजाची होती. श्रीकृष्णांनी भीष्माचार्यांच्या ज्ञानाचं महत्त्व निवेदन केलं. महाभारताचं शांतीपर्व भीष्माचार्यांच्या ज्ञानाचं आहे. किती ज्ञान आहे विलक्षण ! सर्व ज्ञान आणखी सांगितलेलं आहे. आणि उत्तरायण सुरु झाल्याबरोबर भीष्माचार्यांनी वाणी बंद केली. ''जे कांही सांगितलं त्याचा तू विचार कर आणि आचरण कर'' असं धर्मराजांना सांगितलं. देह टाकण्याकरता त्यांच्या अंत:करणाची पूर्ण तयारी आहे. इतकं शाब्दज्ञान आहे. श्रीकृष्णाने सुद्धा त्यांच्या शाब्दज्ञानाचं महत्त्व सांगितलं आहे. इतकं ज्ञान जवळ असून त्याचीही काही पर्वा नाही. ते सोडून दिलय. वाङ्निरोध झालेला आहे. वाणी बंद केलेली आहे. शाब्दज्ञान, त्या शाब्दज्ञानाचा उपयोग म्हणजे दुसऱ्याची संशयानिवृत्ती करण्याकरता होतो. शाब्देपरेच निष्णात ! ब्रह्मज्ञानी महात्म्यांच्या लक्षणामध्ये हे ही सांगितले आहे. कारण प्रश्न करणारा भेटला कुणी तर त्याच्या प्रश्नाचं समर्पक उत्तर देऊन समाधान करता आलं पाहिजे. तीही शक्ती पाहिजे. श्रवण, मनन, निदिध्यासन,

नी
ळं
या
ना
त.
***ही.***
***तर***

ती.
चं
ण !
रु
लं
लं.
कं
त्त्व
ही.
हे.
त्ती
या
णी
लं
न,









साक्षात्कारापर्यंत जे पोचलेले आहेत त्यांना शाब्दनिष्णांत होणं काही कठीण नाही. सर्वही आणखी ते करु शकतात. ***पण संशयनिवृत्ती करणं हे आवश्यक आहे असं नाही. प्रारब्धकर्माने त्याची संशय निवृत्ती व्हायची तर होईल. पण ती जबाबदारी आपल्यावर घ्यायची असं नाही.***

नरसोबाच्या वाडीला नारायण स्वामी महाराज म्हणून एक दत्तभक्त होऊन गेले. काशीला जाऊन त्यांनी उत्तम अभ्यास केला. बारा वर्षे राहून आणखी उत्तम बुद्धीमत्ता संपादन केली, समोर बृहस्पती जरी वादविवादाला आला तरी त्याला निरुत्तर करता आलं पाहिजे ही वासना त्यांच्या मनामध्ये राहिलेली आहे. एका संन्यासी महात्म्यांच्याजवळ राहून नारायणस्वामींनी वेदांचा अभ्यास केला. आवश्यक ते ज्ञान संपादन करुन झाले आणखी आता जायचं गावाला. त्यांच्या गुरुमहाराजांना त्यांच्या मनांतली सुप्त इच्छा समजली आणि त्यांनी विचार केला की एवढा चांगला दैवीगुणसंपन्न कुठं निघाला वादविवाद करायला. वादविवाद करुन आपले श्रेष्ठत्व जगामध्ये, आणखी दाखवायचं, काय करायची वासना? निर्वासन अंत:करण केलं पाहिजे. शिष्याचं खरं कल्याण हे गुरु होत.

गुरु शब्दाचे दोन अर्थ ज्ञानराज करतात. मातापितरांची आज्ञा पालन केली पाहिजे. गोपाळकृष्ण, बलरामजी मातापितरांच्या आज्ञेमध्ये होते. पित्याची आज्ञा मान्य करुन, राज्यत्याग करुन भगवान रामचंद्रप्रभू वनवासामध्ये गेले. ती आज्ञा पालन केली पाहिजे. त्यांची सेवा केली पाहिजे. हा एक अर्थ आणि दुसरा अर्थ आणि संसारा ऐसा जाणून। जो भेटताची हरी। ज्ञान जाणी सकर्म । भजिले

जो । असं म्हणतात. ही गुरु शब्दाची दुसरी व्याख्या आहे. संसारा ऐसा जाणून म्हणाले. केवढा प्रारब्ध भोग आहे हा ! किती अनादीकालापासून चालत आलेला आहे आणि हा जायचा कसा? तर ***सद्‌गुरुंची भेट झाल्यावर तो निघून जातो आहे.*** त्याची सेवा करावी, भजन करावं, ईश्वरभावनेने सद्‌गुरुंची सेवा करावी.

तेव्हां या महात्म्याला संसारातून बाहेर काढलं पाहिजे, असं नारायणस्वामी महाराजांच्या गुरुंनी ठरवलं. ते दोघे नदीवर रोज आंघोळीला जात होते. त्याप्रमाणे गेलेले आहेत. गुरुही गेलेले आहेत. शिष्य बरोबर आहेत. आणि छाट्या वगैरे घेतल्या गुरुमहाराजांच्या, पाणी कमंडलू भरुन घेतलं आणि निघाले. गुरुमहाराजांनी विचारलं, ''काय शास्त्री महाराज? तुमची ज्ञानाची, विद्येची सगळी इच्छा, पूर्ण झाली की नाही? कारण तुम्ही इथे विद्यापीठामध्ये येऊन राहिला, तुमच्या इच्छेप्रमाणे विद्या मिळाली ना? विद्येला अंत नाही. पण आपल्या कृपेनं विद्या मिळाली. मग गुरुदक्षिणा वगैरे द्यायला नको कां? विद्या तुम्ही आणखी बारा वर्षे राहून घेतली म्हणजे गुरुदक्षिणा द्यायला पाहिजे.''

नारायणस्वामींना वाटलं आता हे काय मागताहेत. ते म्हणाले, ''आपल्या सामर्थ्याने माझ्या शक्तीप्रमाणे देतो.'' गुरुमहाराज म्हणाले, ''पाणी हातात घेऊन संकल्प सोडा. गुरुदक्षिणा मी देतो.'' नारायणस्वामींनी कबूल केलं.

आणि गुरुमहाराजांनी सांगितलं, ''नारायणशास्त्री, आजपासून कोणाबरोबरही वादविवाद करायचा नाही. ही त्यागरुपी दक्षिणा मला तुम्ही द्या. वादविवाद करायचा, आपण बुद्धीमान आहोत, आपण

श्रेष्ठ आहोत हे सिद्ध करायचे. शाब्दज्ञान आपल्याला पुष्कळ आहे. पण आपण वचन द्या की कोणाही बरोबर वादविवाद करणार नाही'' शास्त्रांचं ज्ञान आपल्याला पुष्कळ आहे, आपली कीर्ती झाली पाहिजे, या वासना नारायणस्वामींच्या मनामध्ये होत्या. त्या वासनाच गुरुमहाराजांनी बंद करुन टाकल्या. गुरुदक्षिणा देतो म्हणून कबूल केलं. नाही म्हणता येईना. वाईट वाटलं. मग गुरुमहाराजांनी त्यांना उपदेश केलेला आहे. म्हणाले, 'तुमचं भाग्य फार मोठं आहे. साक्षात् भगवान दत्तात्रेय तुम्हांला संन्यासदीक्षा देणार आहेत. उपदेश देणार आहेत. त्यांची सेवा तुम्ही करा नरसोबावाडीला जाऊन.'' असं त्यांना सांगितलं आणि नंतर नारायण स्वामी वाडीमध्ये राहिले.

***तर संशयनिवृत्ती करणं हे शाब्दज्ञानाचं मुख्य कारण आहे. संशयनिवृत्ती झाली म्हणजे मनाचं समाधान*** होतं हा विषय चालू आहे. तेव्हां गुरुमहाराजांच्या आशीर्वादाप्रमाणे नारायण स्वामींना प्रत्यक्ष नरसिंहसरस्वती स्वामीमहाराजांनी संन्यासाश्रम दिला आणि नरसोबावाडीमध्ये दत्तप्रभूच्या आज्ञेनं ते राहिले. त्यांचा अखंड ध्यानयोगचा अभ्यास आहे. सगुण निर्गुण सगळं एकच मानतायत. सगुण निर्गुण एकच हा सिद्धांत आहे ज्ञानराजांचा. त्या प्रमाणे आणखी उपासना चालू आहे.

गावामध्ये एक कुष्ठी, कुष्ठरोग, महारोग झालेला मनुष्य गावाबाहेर झोपडी बांधून राहात होता. दत्तमहाराजांची आपल्यावर कृपा व्हावी आणि आपण या प्रारब्धकर्मातून मुक्त व्हावं अशी त्याची इच्छा. एके दिवशी आणखी भगवान नरसिंहसरस्वती दत्तात्रेयांनी त्याच्या स्वप्नामध्ये जाऊन सांगितलं 'या ठिकाणी एक नारायण

स्वामी महाराज म्हणून आहेत. रोज संगमावर सकाळी स्नान करण्याकरता ४ वाजतां जातात. तेव्हां त्या ठिकाणी तुम्ही जा. त्यांनी वर स्नान केल्यावर त्यांच्याखाली तुम्ही उभे रहा. त्यांनी स्नान केल्याबरोबर तुम्ही स्नान करा. त्यांच्या अंगावरचं पाणी तुमच्या अंगावर पडू द्या. तुमचा महारोग बरा होईल.''

त्याला आज्ञेप्रमाणे तो रात्रीच नारायणस्वामींच्या संगमावर यायच्या रस्त्यामध्ये जाऊन बसला. ४ वाजतां स्वामी महाराज निघाले. आणखी प्रार्थना करुन स्नानाकरता नदीत उतरणार. ब्राह्मण नदीत खाली जाऊन उभा राहिला होता. नारायणस्वामींच्या लक्षामध्ये सगळा प्रकार आला. देव सर्वज्ञ आहे. भक्तही सर्वज्ञ आहे. त्याचं प्रेमच तसं आहे. नारायणस्वामी महाराज नदीच्या पात्रातून बाहेर आले. तो मनुष्य आत उभा राहिला आहे. त्याला विचारले, ''का बाबा तू इतक्या रात्री ४ वाजतां कशाला आला आहेस?'' तो म्हणाला, ''स्नान करण्याकरता'' तेव्हां ते म्हणाले ''मग स्नान करुन निघून जा'' तो म्हणाला नाही, ''तुम्ही स्नान केल्यानंतर मला स्नान करायचं आहे'' महाराजांनी विचारले ''हे तुला कोणी सांगितलं?''

तो म्हणाला, ''मला दत्तात्रेयांची आज्ञा आहे, माझा रोग बरा व्हायचाय, त्यांनी आज्ञा केली तुमच्याबरोबर स्नान करायची'' नारायणस्वामी म्हणाले, ''चल माझ्याबरोबर'' आणि त्याला घेऊन दत्तात्रेयांच्या समोर आले खाली नदीमध्ये. अजून कोणी मंडळी उठली नव्हती, बाहेर उभे राहिले. त्याला सांगितलं. ''स्नान कर म्हणाले'' केलं स्नान. त्याला सांगितलं, ''जुनी वस्त्र टाकून दे, दुसरी वस्त्र

नेस. अंग सगळे एकदा पाहून घे. काही नाही. अंगाला रोग नाही, काही नाही. आणि आताच्या आता या गावातून निघून जा. सूर्योदय होईपर्यंत तू या गावात रहाशील तर तुझं शरीर पुन्हा पूर्वीप्रमाणे होईल.'' त्यांनी विचार केला हा सांगत हिंडणार सगळ्यांना, मला नारायणस्वामींनी बरं केलं. त्याचा महारोग बरा झाला. त्याला घालवून दिलं आणि वर जाऊन नारायणस्वामींनी आपल्या दंडाला परशु मुद्रा बांधली आणि खाली आले. अजून कोण उठलेलं नाही. गावाला जायच्या वेळेला ही परशुमुद्रा बांधतात.

आतून दत्तप्रभुंचा आवाज आला, ''काय स्वामीमहाराज? कुठं प्रवास आहे आता? गावाला निघाला? तुम्हांला आमचा कंटाळा आलेला दिसतोय !'' नारायणस्वामी म्हणाले, ''तुम्हांलाच आमचा कंटाळा आलेला दिसतोय.'' दत्तप्रभुंनी नारायणस्वामींचा दंड धरला, ''थांबा म्हणाले, वंदन करु नका. आम्हांला तुमचा कंटाळा आला म्हणून कोणी सांगितलं?'' नारायणस्वामींनी विचारले, ''त्या ब्राह्मणाच्या स्वप्नात जाऊन त्याला सांगितलं माझ्याबरोबर स्नान करायला. तो ब्राह्मण तुमच्या समोर स्नान करुन बरा होऊन गेला. तेव्हां अशा उपाधी आपण जर मला लावत असाल तर आपल्या सान्निध्यात येऊन काय करायचंय? प्रारब्धकर्म हा आमचा दोष आहे. जीवाचा दोष आहे. परंतु आपण आहात ना !'' आपण भक्तांचे दोष पहायचे नाहीत.

दत्तप्रभु म्हणाले, ''अहो तुमच्यासारख्या ज्ञानी माणसाचं जगाकडे लक्ष नको कां? जगाचा उद्धार कसा व्हायचा?'' नारायणस्वामींनीही उत्तर दिलं, ''जग ज्यांनी निर्माण केलं त्याचं

काम आहे ते. आमचं काम नाहीये. आम्ही फक्त आपलं ध्यान करीत रहाणार. आपली उपासना करणार. चिंतन करीत रहाणार.'' हे उत्तर त्यांनी दिलेलं आहे. त्यावेळी दत्तप्रभु ''जा आता तुम्ही लवकर स्नान करा. आम्ही तुमच्या वाटेला जाणार नाही.'' आणि असं म्हणून ते भांडण मिटलं.

देव भक्ताचे भांडण । पराभक्तीचे ठाण । हे **पराभक्ती**चे म्हणून उदाहरण दिलेलं आहे. ***तेव्हां शाब्दज्ञान हे पूर्ण जरी असलं तरी त्या पूर्ण ज्ञानाचं फल लोकांचा उद्धार करणं, संशय दूर करणं, प्रवचन वगैरे करणं हा मुख्य उद्देश नाहीये. परमात्मा सगळं करणारा समर्थ आहे.***

***अर्जुनाला आणखी मी विचार करु शकतो हा अहंकार झाला.*** आणि त्यामुळे आरंभाला मी हे युद्ध करणार नाही. पाप लागणार आहे. अमुक लागणार आहे. सगळा आपणच आपला निर्णय करुन टाकला त्यांने. भगवान स्वस्थ होते. शेवटी त्यालाच आणखी आपला अहंकार झाला असं वाटलं. आणि ''मी आपल्याला शरण आलेलो आहे. धर्माधर्माचा निर्णय मी करु शकत नाही. माझी बुद्धी नाही. तेव्हां मी आपल्याला शरण आलेलो आहे. हा अहंकार जेव्हां टाकून दिला अर्जुनाने त्यावेळी भगवद्गीतेच्या उपदेशाला सुरुवात झालेली आहे.

धर्मस्थापना कशी करायची, काय करायची, निमित्त काय करायचं हे सगळं ठरलेलं आहे. परमात्म्याची इच्छाशक्ती एवढी मोठी आहे, नियामक इच्छाशक्ती. अर्जुन पाहिजे होता असं नाही. पण अर्जुनाचंही कल्याण करायचं होतं. म्हणून त्याला निमित्त करुन,

गीताशास्त्राचा उपदेश भगवंतांनी केला.

त्याचप्रमाणे आणखी भीष्माचार्यांना संपूर्णपणे शाब्दज्ञान होतं. काही मनामध्ये आसक्ती नाही. आणखी या प्रमाणे भगवंताचं ध्यान करतायत. समोर भगवान पीतांबरधारी उभे आहेत. आणि त्यांचं ध्यान चाललेलं आहे. आपलं शरीर विसर्जन करायचं आहे आता. इच्छामरणी ते होते. पित्याच्या वरप्रदानामुळे. यमधर्म तुला स्पर्श करणार नाही. त्याप्रमाणे आणखी आता हे शरीर ठेवायचं नाही. असं त्यांनी ठरवलं. भगवंताची स्तुती केली त्यांनी. त्यात त्यांनी आरंभाला आणखी म्हटलेलं आहे. ही माझी बुद्धी मी आपल्याला अर्पण केलेली आहे. हे मुख्य आहे. कोणचीही वासना या बुद्धीमध्ये शिल्लक राहिलेली नाही. ***लक्ष द्यायचं तर आपल्या बुद्धीकडं, आपल्या इंद्रियांच्या संयम, निग्रह याकडे लक्ष दिलं पाहिजे. मनानेच सगळं करायचं. परमार्थही मनानेच होणार, संसारही मनानीच होणार. त्या मनाचं आणखी पूर्ण लक्ष आहे. मनानी पहायचं, विचार करायचा म्हणजे किती वासना शिल्लक आहेत. किती गेलेल्या आहेत. किती राहिलेल्या आहेत. स्वतःच्या बुद्धीचं परिक्षण, स्वतःच बुद्धीनंच करायचं आहे.***

त्या बुद्धीनं आपल्या बुद्धीचे निरिक्षण करणारे भीष्माचार्य सांगतात. ''माझी बुद्धी वितृष्ण आहे. काहीही तृष्णा नाहीये. वासना नाहीये. जी मी आपल्याला अर्पण केलेली आहे.'' ईश्वर स्वरुपाचं चिंतन त्यांचं दोन्ही प्रकारांनी असलं पाहिजे. देशकाल मर्यादा याला नाहीत. देशपरिच्छेद, कालपरिच्छेद, वस्तुपरिच्छेद याला नाही आहे. अशा प्रकारचा असा आणखी एकमेवद्वितीय परमात्मा त्याला ही

बुद्धी अर्पण केली. हा एक अर्थ. अथवा निजानंदामध्ये निमग्न असणारा तो परमात्मा हे सांगतात, म्हणाले भीष्माचार्य, ज्या वेळेला बहुरुप आपण व्हावं अशी इच्छा झाली, संकल्प झाला, कृपा करावी अशी इच्छा झाल्याबरोबर त्या प्रकृतीचा संबंध, त्या प्रकृती संबंधामुळे अनंत ब्रह्मांडाची निर्मिती झाली. म्हणजे सगुणही परमात्मा तोच आहे आणि निर्गुणही तोच आहे. हा सिद्धांत भीष्माचार्यांनी येथे दाखवलेला आहे.

तुज सगुण म्हणू की निर्गुण रे । सगुण निर्गुण एकु गोविंदु रे । ज्ञानराजांनीही हाच सिद्धांत मांडलेला आहे. तेव्हां त्या प्रमाणे आणखी शमसिद्धी पूर्ण झाल्यानंतर त्यात संन्यासही आलेला आहे. पूर्ण वैराग्य आहे. आणि या प्रमाणे संन्यासाश्रम निर्वासन अंत:करण अधिकाधिक झालेलं आहे. आणि अशा रीतीनं संन्यासाश्रम घेतल्यानंतर हे करायचं आहे. श्रवण, आत्मानुसंधान आहे. मनन आहे. निदिध्यासन आहे. त्याच्यामध्ये सगुणाचेही ध्यान करायला हरकत नाही.

शुकाचार्य महाराजांनी सबंध भागवताचा अभ्यास केला. पूर्ण ब्रह्मज्ञानी होते. यांनी स्त्री, पुरुष हा भेद सुद्धा त्यांच्या बुद्धीमध्ये राहिलेला नाही. अशी ज्यांची योग्यता आहे. सर्वत्र ब्रह्मात्मभाव झालेला. परंतु आणखी सगुण परमात्म्याच्या कथा ऐकणं, सांगणं, अधिकारी महात्म्याला सांगून त्याचा उद्धार करणं, हे त्यांनाही आणखी आवडत होतं. त्याप्रमाणे भगवंताची उपासना, श्रवण, मनन निदिध्यासन, सगुणाचं श्रवण, मनन, निर्गुणाचं श्रवण, मनन हे सगळं श्रवण करुन बुद्धीमध्ये असलेले दोष सगळे दूर झालेले आहेत. आणखी समाधी अवस्था प्राप्त झाल्यानंतर मग आत्मसाक्षात्कार

सांगितला आहे. तेव्हां ही योग्यता संन्यासी महात्म्याशिवाय नाही आहे. संन्यासाचा आग्रह आचार्य महाराज करत असतात. नाही. संन्यासाचा आग्रह कशाला? स्वत:च मताने त्यांनी काहीच सांगितलं नाही. गीताभाष्य लिहितांना आणि गीतेचा खरा अर्थ काय आहे. लोकांना कळावा त्या करता भ्रांती होऊ नये या करता हे विवेचन केलेले आहे. त्याप्रमाणे ज्यांनी खरा संन्यास धारण केलेला आहे. आचार्य महाराज हे मुद्दाम सांगतात खरे भाग्यवान ते आहेत. कुठंही झाडाखाली रहाणारे आहेत. काही त्यात नाही, मोठं घर पाहिजे, अमुक पाहिजे, काही नाही. कुठंही झाडाखाली रहाणारे आणि संग्रहात काहीच नाही.

ज्याच्या सर्व वासनांची समाप्ती झालेली आहे अशा महात्म्यांकडे पूर्ण वैराग्य आहे. भगवंताची पूर्ण कृपा आहे. त्यामुळे प्रारब्धाची आडकाठी येऊ शकत नाही. भगवान गोपालकृष्णांनी उपदेश करतांना सांगितले उद्धवजींना, संन्यासी पुरुषांनी पृथ्वीवर नेहमी फिरत राहिलं पाहिजे. कोणच्याही गावामध्ये एका रात्रीशिवाय मुक्काम करायचा नाही. ज्याचं प्रारब्ध असेल ते आपोआप तिथे येतात जिज्ञासेने शंका विचारतात. सद्‌बुद्धीनं विचारल्यावर त्यांना सन्मार्गदर्शन करायचं. ज्या प्रमाणे श्रद्धा असेल त्याप्रमाणे आचरण केलं तर कल्याण होईल. ते कार्य झाले की निघाले दुसरीकडं, पुन्हा काही संबंध नाही. तर सर्वही समाजाचं कल्याण करण्याकरता सर्वत्र त्यांनी प्रवास केला पाहिजे. हे संन्याशाला मुद्दाम सांगितलं आहे. पण जास्ती कुठं थांबायचं नाही. कुणाच्याही घरात म्हणा, मंदिरात म्हणा, एक रात्र रहायचं, स्वामी दुसऱ्या दिवशी गेले. दुसरीकडं,

कुठं राहिले, कुठं गेले काही पत्ता नाही. असे व्हायला पाहिजे. संचाराच्या योगाने आणखी अनेक लोकांना सन्मार्गदर्शन घडत असेल. जिज्ञासू मंडळीही असतात ना । सगळेच काही सगळ्यांच्या जवळ रजोगुण, तमोगुण जास्त असतात असे नाही. सत्वगुण मिळवलेले असेही लोक असतात. अनेक जन्म गेलेले आहे. ईश्वराची उपासना झालेली आहे. कर्मानुष्ठानं केलेली आहेत. संतमहात्म्यांची कृपा झालेली आहे. त्यामुळे सात्विक असं मन बनलेलं आहे. त्यामुळे असे महात्मे थोडावेळ का होईना एकदा भेटले त्यांनी मार्गदर्शन केलं तरी लगेच ह्या लोकांना बोध होतो. आचरण करुन ते मुक्त होतात. म्हणजे संन्यास म्हणजे सर्वांना उपकारक आश्रम आहे. गृहस्थाश्रम उपकारक म्हणून कालीदासांनी वर्णन केलेला आहे. परंतु खरा उपकारक म्हणजे संन्यासाश्रम आहे. पूर्ण योग्यता आणखी मनाची, इंद्रियांची, संयमाने निर्माण करुन मनातल्या सगळ्याही वासना घालवून भगवंताची उपासना अखंड चालू आहे. आणि समाधी सिद्धी ईश्वर प्रसादाने प्राप्त करुन देऊन आणि सर्व लोकांचा उद्धार करतायत.

तेच **आचार्य महाराजांनी साधनापंचकात** शेवटी सांगितलं आहे. एकान्तामध्ये आणखी आसनावर बसावं, मनामध्ये काही वासना नाहीत, संन्यासी महात्म्यानं, सच्चिदानंद परमात्म्याच्या ठिकाणी अंत:करण स्थिर करायचं. मूर्त पदार्थ जगामध्ये आहेत. अमूर्त पदार्थ जगामध्ये नाहीत. अशी आपल्या मनाची कल्पना झालेली आहे. पण अमूर्त अशा प्रकारचं हे अव्यक्त स्वरुप आहे. शब्दांनी शब्दशास्त्रज्ञ जे महात्मे आहेत, यांच्या वाक्यावरुन समजून

घेऊन श्रद्धेने त्याचं ध्यान करावं. निदाध्यासनापर्यंत आलेले आहेत. श्रवण झालं, मनन झालं, निदिध्यासन सांगतात आचार्य महाराज. त्या निदिध्यासनाच्या योगाने समाधी सिद्धी झाली म्हणजे पूर्ण आत्मा जो आहे, सच्चिदानंद परमात्मा त्याचा आणखी साक्षात्कार करुन घ्यावा.

सारखा जगाचा प्रवाह नित्य मानणारे लोक आहेत. परंतु जगाचा नाश होतो. तर हे ज्ञान 'वासुदेव सर्वं' ज्ञान झाल्यानंतर सबंध जग संपलेलं आहे. जगाचा नाश झाला. अज्ञानही गेलं. पुढची व्यवस्था सांगतात आचार्य महाराज. पूर्वी झालेली ही कर्म अनंत जन्मामध्ये झालेली आहेत. ही सगळी संपून जातील. पूर्वी केलेल्या कर्माचा आणखी नाश होतो. ब्रह्मसाक्षात्काराने पूर्वीची संचित कर्म नष्ट झालेली आहेत. क्रियमाण कर्मांचा संबंध नाही. निर्वासन अंत:करण, भगवत् परायण अंत:करण झालेलं आहे. साक्षात्कार झालेला आहे त्या अंत:करणाला. त्या ठिकाणी कर्माचा संबंध असू शकेल का?

गृहस्थाश्रमी माणसाने वेदांत ऐकायचा नाही असं नाही. पापक्षय होईल. चांगले आणखी वेदान्ताचे विषय श्रद्धेने ऐकले तर पापक्षय होतात. पण ***वासनाक्षय होत नाही ना । वासना मनामध्ये जास्ती जास्ती वाढतात. पूर्व संचित पुष्कळ आहे. क्रियमाण कर्माचा संबंध असल्यामुळे वासना जास्ती जास्ती वाढतात. अशा स्थितीमध्ये वासनाक्षय कसा होणार? म्हणून वासनाक्षयाचा अभ्यास श्रवण, मनन, निदिध्यासनाने ज्यांनी केलेला आहे असे संन्यासी महात्मे वैराग्य संपन्न असणार आहेत. त्यांना*** ब्रह्मलोक सुद्धा नको, काही नको. राजसूय यज्ञ ब्रह्मलोक मिळण्याकरता म्हणून धर्मराजांनी केला

म्हणून सांगतात. पुनरावृत्ती नाही हे फायदा असेल तिथं ब्रह्मदेव असेपर्यंत तिथं थांबा म्हणाले. लगेच मुक्ती नाहीये. तर त्या दृष्टीनं ब्रह्मदेव सुद्धा आम्हांला नको काही नको. इतकी वैराग्य भावना, इतकी निर्वासनावस्था आणखी मनाची संपादन करणारे महात्मे शेवटी आणखी जीवनमुक्त स्थितीतूनही देहमुक्त होतात. देहत्याग त्यांचा होतो. कर्म संपल्याशिवाय जन्म थांबणार नाहीये.

***तेव्हां जन्म नको असेल तर कर्म संपले पाहिजेत तीच कर्म संपवण्याकरता कर्मयोग आहे, ध्यानयोग आहे, भक्तीयोग आहे. अष्टांगयोग आहे.*** हे सगळे उपाय शास्त्रकारांनी सांगितले आहेत. ज्ञानराजांसारख्या संतमहात्म्यांनी त्याचं स्पष्टीकरण उत्तमप्रकारे करुन ठेवलेलं आहे. त्याप्रमाणे या ठिकाणी आजपासून आणि एका संन्यासी महात्म्यांचा पुण्यतिथी उत्सव सुरु झालेला आहे. शताब्दी उत्सव, पवित्र क्षेत्रामध्ये त्यांचं आणखी वास्तव्य झालं. त्यांनी श्रवण, मनन, निदिध्यासन करुन कृतर्थता मिळवलेली आहे. अशा प्रकारचे संन्यासी पाहिल्याबरोबर पवित्रता निर्माण करतात. राजदर्शनाने राजाचे दर्शन झाले की तो पवित्र झाला. भिक्षु म्हणजे संन्याशाचं नुसतं दर्शन जरी झालं तरी पापक्षय होतो. आणि महोदधी आहे. समुद्राचं दर्शन झालं तरी पापक्षय होतो. त्याप्रमाणं आणखी संन्यासी महात्मे पाहिल्याबरोबर पापक्षय करणारे असतात. आत्मचिंतनामध्ये अखंड निमग्न असतात. पूर्ण वासनाक्षय करण्याचा प्रयत्न त्यांचा चाललेला आहे. वासनाक्षय झालेला आहे. आत्मसाक्षात्कार प्राप्त करुन घेऊन कृतार्थ झालेले आहेत. आणि जगाला सन्मार्गदर्शन करणं एवढंच त्यांचं कार्य आहे. तेव्हां अशा रीतीनं या उत्सवाच्या

निमित्ताने काही थोडीशी वाङ्मयसेवा घडण्याचा योग आला आणि सर्वही मंडळींचे निरंतर चिंतन, मनन, श्रवण, निदिध्यासन अखंड चाललेलं आहे. ज्ञानेश्वर महाराजांनी हे ग्रंथ करुन ठेवलेले आहेत. पण त्याचा शेवट 'एक तरी ओवी अनुभवावी' इथे आहे. इथपर्यंत पोहोचले पाहिजे तो पर्यंत आपलं मन तिथपर्यंत जात नाही. अनुभवात्मक ज्ञान पाहिजे. तरी सुद्धा अहंकार चित्तामध्ये न रहाता, श्रद्धेने आणखी पूर्ण मुमुक्षा धारण करुन जर त्याचंही श्रवण, मनन, निदिध्यासन अखंड चालू राहिलं, या ठिकाणी दिसत आहे. 'स्वस्तिश्री' सारखं मासिक निघतय. ज्ञानेश्वर महाराजांची काय काय श्रद्धास्थानं किती होती. त्याचं विवरण त्यांच्या त्या लेखमालेतून चालू आहे. चांगलं आहे. त्याचंही चिंतन करावं आणखी. ***चिंतन मननाचे दोन प्रकार त्यांनी सांगितले आहेत. एकट्याने मनन करणं. एकट्याने जे ऐकलेले आहे त्याचं एकट्याने मनन करणं, किंवा बरोबरची जी मंडळी असतील, सहाध्यायी म्हणा, गुरु म्हणा यांच्याबरोबर विचार करणं हे ही मनन आहे.*** आता तसं मनन आपल्याला प्रत्यक्ष ज्ञानराजांच्या बरोबर करण्याचं भाग्य आपलं नाहीये. 'सच्चिदानंद बाबा आगळु लेखकु जाहला' त्यांनी कृतज्ञता शेवटी लिहून ठेवली. त्यांनी लिहून ठेवलं म्हणून आपल्याला मिळालं तरी पहायला. नाही कसं मिळणार? त्यांचे ग्रंथ आपल्यासमोर आहेत. त्याचं स्थान या ठिकाणी आहे. त्या स्थानाचंही विशेष महत्त्व आहे. तशा स्थानामध्ये जाऊन श्रद्धेनं त्या ग्रंथांचं आणखी चिंतन करायला सुरुवात केल्यानंतर आणि त्यांच्याच प्रेरणेनं बुद्धीमध्ये 'एक तरी ओवी अनुभवावी' ही वेळ येणार नाही असं नाही. परंतु चित्ती आस्था

पाहिजे. श्रद्धा पाहिजे. त्याप्रमाणे सर्वांच्या अंत:करणामध्ये आपल्या अशाप्रकारची श्रद्धा भक्ती आहे. आणि आपल्याला हे निरंतर घडतंय हा उत्सवाचा योग आलेला आहे. याचाही आणखी आपण फायदा घेऊन आपला मनुष्य जन्म कृतार्थ व्हावा. या करता प्रयत्न करायचाय. नि:संग, असंग अंत:करण झालं पाहिजे. भीष्माचार्यांच्या प्रमाणे संसारात राहून आणखी असंग अंत:करण आहे. हे किती मोठं कठीण आहे. तर अशा रीतीनं स्पष्ट सगळं सांगितलं आहे.

***कर्तृत्व अहंकार, मी कर्म करतो आहे. मी अमुक ज्ञान मिळवलेलं आहे. मी प्रवचन करतो आहे. मी अमुक करतो आहे. असे म्हणून उपयोग नाही. आणि या कर्माचं फल मला मिळालं पाहिजे कर्मफलाभिलाषा असणार. हाच बंध आहे म्हणतात ज्ञानराज. ते दोन्ही बंध आमचे गेल्याशिवाय अनुभव कसा यायचा ओवीचा. खरा अर्थ ज्ञानराजाच्या ओवीचा समजणार कसा? नामदेव महाराजांनी सांगून ठेवलेलं आहे. अनुभव घ्या.*** तसा अनुभव त्यांना मिळालेला आहे. ते मोठे उपासक होते. भक्त होते. तर अशा दृष्टीनं महाराजांच्या, ज्ञानेश्वर महाराजांच्या कृपेनं सर्वांची बुद्धी अशी निर्वासन होत होत क्रमानं अधिकारी बनावी. आणि अशा अधिकारी, अशा प्रकारच्या बुद्धीमध्ये आत्मसाक्षात्काराची योग्यता प्राप्त व्हावी. आणखी सर्वांचं कल्याण व्हावं एवढीच प्रार्थना करुन आजची ही सेवा त्यांना निवेदन करुन पुढे जाऊ या.

**पुंडलिक वरदा हरी विठ्ठल । श्री ज्ञानदेव तुकाराम ।**

## महामंत्राचा अर्थ

## ॥ दिगंबरा दिगंबरा श्रीपाद वल्लभ दिगंबरा ॥

*ब्रह्मानंदम् परम सुखदम् केवलम् ज्ञानमूर्तिम् ।*
*द्वंद्वातीतम् गगन सदृश्यम् तत्वमस्यादि लक्ष्यम् ॥*

दिगंबराची धून चालू असताना तन्मय अवस्था प्राप्त होणे ही ईश्वराची मोठी कृपा आहे. असं भजन म्हणा, गायन म्हणा ज्या ठिकाणी चालू असेल त्या ठिकाणी ईश्वराचा निवास असतो.

या महामंत्राचा अर्थ विषद करण्याकरता सद्गुरू वासुदेवानंद सरस्वती स्वामी महाराजांनी एक आरती केली आहे. त्या आरतीचा विचार आज यथामती थोडासा करावयाचा आहे. ''दिगंबरा दिगंबरा श्रीपाद वल्लभ दिगंबरा'' हे शब्द मूळ संस्कृतमध्ये असल्याने मंत्ररूप आहेत. मराठी आणि संस्कृतमध्ये या शब्दांचा उच्चार सारखाच होतो.

वेदान्त शास्त्राप्रमाणे दृकतत्त्व व दृष्यतत्व असे दोनच पदार्थ जगात दाखविलेले आहेत. ज्ञात होणारे, प्रकाशित होणारे असे एक आहे आणि दुसरे दृक परमात्म तत्वं. बहिर्मुख चित्तवृत्ती ज्या वेळेला असते -- तशी सर्वदाच असते, स्वभावच आहे तो चित्ताचा, इंद्रियांचा आणि ती चित्तवृत्ती ज्या वेळेला अंतर्मुख होईल त्यावेळी प्रकाशमान होणारा तो, प्रत्यग्आत्मा त्याला म्हटलेलं आहे. बाहेरचे पदार्थ जसे जसे भासतात त्याच्या उलट आतलं आहे. दु:खरूप आपल्याला बाहेर दिसतं तर आतला आनंदस्वरूप आहे. विनाशी

पदार्थ दिसतात बाहेरच्या जगात आपल्याला, याच्या उलट हा अविनाशी आहे. अशुद्ध पदार्थ सर्वत्र आहेत तर हा शुद्धच आहे. पर प्रकाशी सर्व पदार्थ आहेत तर हा स्वयंप्रकाशी आहे. बाहेरचे सर्व पदार्थ विकारी आहेत तर हा निर्विकारी आहे. जन्मापासून मृत्युपर्यंत षड्‌विकार प्रत्येक बाह्यपदार्थात आहेत आणि हा परमात्मा ''भावातीतम्'' म्हणजे भावपदार्थाच्या उलट आहे.

तर असा जो परमात्मा आहे त्याचं अनुसंधान करावयाचं आहे. इंद्रियांची बहिर्वृत्ती असल्यामुळे देहत्रयाशिवाय दुसरं काहीही आपल्याला प्रकाशित होत नाही. देहत्रयामध्ये शास्त्रकारांनी पंचकोषांची रचना केलेली आहे. अन्नमय, प्राणमय, मनोमय, विज्ञानमय आणि आनंदमय असे पांच कोष आहेत. स्थूल देह हा अन्नमय कोष म्हटलेला आहे. आत्म्याची ओळख करून देताना स्थूल देहालाच आत्मा म्हणून त्यांनी सांगितलेलं आहे. तिथून सुरवात करायला सांगितली आहे. हाच अन्नमय कोष म्हणजे आत्मा आहे. त्याच्यानंतर प्राणमय कोष आहे. प्राणवायू, कर्मेंद्रिये हा जो विभाग आहे, हा प्राणमय कोष म्हणून सांगितला आहे. त्याच्यानंतर मनोमय आणि विज्ञानमय असे दोन कोष आहेत. शेवटी आनंदमय कोष म्हणून आहे. चित्ताचा संबंध इथे संपलेला आहे. त्याठिकाणी केवळ अज्ञान म्हणून आहे. मूळ ज्ञानशक्ती ईश्वराची आहे, कर्मशक्ती ईश्वराची आहे आणि कार्यशक्तीही ईश्वराची आहे आणि या शक्तींच्याद्वारा सृष्टीच्या नियमनाचे कार्य चाललेलं आहे.

तर स्वयंप्रकाशी असा जो आत्मा आहे, प्रत्यग्‌आत्मा ज्याला

म्हणतात, आपली प्रवृत्ती आहे म्हणून तो आत आहे असं म्हणतात. नाहीतर तो आहे म्हणजे बाहेर नाही असं म्हटलं तर सिद्धांत भंग होईल, सर्वव्यापी तो आहे. ज्याला देशाची, कालाची कशाची मर्यादा नाही असं ते परमतत्व आहे.

नामदेवांनासुद्धा ज्ञानी भक्तांनी या तत्त्व दृष्टीनं कच्च ठरविले. पांडुरंगाच्या जवळ गेल्यानंतर त्यांनीही सांगितले, हो बाबा, खरं आहे. त्यावर नामदेव म्हणाले, माझ्याशी तुम्ही बोलता, माझ्या घरी येता, माझ्या हातचे जेवता, माझी कामंसुद्धा करता त्यावर देव म्हणाले, पांडुरंग राऊळामध्येच आहे हे समजणं कच्चेपणाचे लक्षण आहे. पांडुरंग सर्व ठिकाणी आहे, सर्वस्वरूप आहे हे ईश्वरदर्शन पूर्ण दर्शन आहे. तर या प्रमाणे अंतरात्मा, प्रत्यग्‌आत्मा, प्रत्यग्‌ब्रम्ह ज्याला म्हणतात त्याचं दर्शन होण्याकरता ज्या मनाचं, बुद्धीचं सहाय्य घ्यायचं ती बुद्धी त्याच्यापर्यंत जाऊ शकत नाहीये. अन्नमय, प्राणमय, मनोमय, विज्ञानमय आणि आनंदमय या पांच कोषांपर्यंतच त्या बुद्धीची झेप पोहचत नाहीये. आनंदमय कोषाच्याही पलीकडे असलेला स्वयंसिद्ध. तो आनंदमयकोष म्हणजे सुषुप्तीच्या वेळेला जो आनंद मिळतो त्याची कोणतीही इंद्रिये नाहीत केवळ ज्याला अगदी अज्ञान म्हणतात तो अज्ञानसंमिश्रीत आनंद त्यावेळेला आहे. शुद्ध आनंदरूप असे जे परमात्मस्वरूप आहे तिथपर्यंत जर मनाची गती झाली, बाहेरून मन हे परावृत्त ज्यावेळेला होईल त्या वेळेला या कोषाचे अनुसंधान करता करता आनंदमय कोषाच्याही पलीकडे एक स्वयंसिद्ध, निर्विकार आत्मतत्त्व आहे हे मनाला समजून येतं,

आणि त्या साक्षीस्वरूपाचं अनुसंधान तितकं उत्कटतेने होत राहिलं पाहिजे. साक्ष म्हणजे दिसणारे दृश्य ''मात्र स्पर्शास्तु कौन्तेय शीतोष्ण सुखदु:खद: । अगमा पाहिमा अविद्या: तान तितिक्षस्व भारत'' ही उच्च भूमिका अर्जुनाला सांगितली आहे. वेदान्त श्रवण, मनन, निदिध्यासन करणं, समाधी त्याचप्रमाणे साक्षात्कार त्या बुद्धितत्त्वाचा करून घेणं इतकी बुद्धीची योग्यता होण्यापूर्वी ते अनुसंधान सुरू करायचं आहे.

सर्वही विश्व हे आगमा बाह्य आहे. आणि अनित्य आहे. याकरता तितिक्षेचा अभ्यास शास्त्रकारांनी सांगितला आहे. इष्ट अनिष्ट कोणत्याही घटना घडल्या तरी समचित्तं रहाणं हा तितिक्षेचा अभ्यास आहे. हे साधून मग स्वरूपानुसंधान करायला सांगितलं आहे. याचं स्पष्टीकरण महाराजांनी आत्मनात्म विवेकामध्ये केलं आहे. हे स्वरूपानुसंधान ज्या बुद्धीनं किंवा मनानं करायचं आहे, निर्विकार जे स्वरूप आहे तो ''दिगंबरा'' शब्दाचा अर्थ आहे. साक्षीस्वरूप सूर्याच्या उदय व अस्तानुसार आपण पूर्व, पश्चिम दिशा वगैरे समजतो.

सूर्यनारायणाच्या (मूर्त स्वरूपानुसार) उदयाप्रमाणे पूर्व दिशा समजतो. आणि जो मूर्त पदार्थ त्या सूर्यनारायणापासून दूर असेल त्याला पश्चिम दिशा समजतात. सूर्यनारायणापासून आमच्या पाठीमागे असलेल्या पदार्थापेक्षा आम्ही जवळ आहोत म्हणून सूर्यनारायणापेक्षा दूर असलेल्या पदार्थाला पश्चिम दिशा असे समजतात. व्यवहारामध्ये दृक तत्वाप्रमाणे विभाग केले जातात. तेव्हा इथे अंबर म्हणजे आकाशाप्रमाणे सर्वव्यापी परमात्म तत्त्व आहे. दिक्

तत्वाप्रमाणे मूर्त पदार्थ अन्नमय, प्राणमय, मनोमय, विज्ञानमय, आनंदमय किंवा स्थूलदेह आणि कारणदेह, सूक्ष्मदेह असे जे तीन देह आहेत या तीन देहांनी वेष्टीत झाले आहे. आवृत्त झाले आहे. त्याला काढायचं आहे. त्यासाठी बुद्धीचं सहाय्य घ्यायचं आहे. सूक्ष्म प्रकाशमान आत्मतत्त्वाचं अनुसंधान करायचे आहे.

मी बसलो, मी उठलो, हे सगळे देहाचे धर्म आहेत. मी पहातो, मी ऐकतो, हे सर्व इंद्रियाचे धर्म आहेत. मी संकल्प करतो, माझ्या मनात राग आहे, माझ्यात दोष आहेत, हे सगळे मनोधर्म आहेत. हे सगळे धर्म ''मी'' च्या ठिकाणी आपल्याला भासतात. आणि शेवटी त्या ''अहम्'' ची शुद्धी होता होता देहत्रयातील देहत्रयाने होणारे सर्वही व्यवहार पाहू शकतो. या व्यवहाराची उत्पत्ती, नाश सर्व मला दिसतो आहे. त्यामुळे मी असंग आहे. माझा याच्याशी काही संबंध नाहीये, हे जे अनुसंधान तो ''दिगंबरा'' या पहिल्या शब्दाचा अर्थ आहे. हे जे आत्मतत्त्व आहे ते सर्व वेष्टीत झालेलं आहे. त्याचे जो अनुसंधान करून, बुद्धीने हे वेष्टन दूर करून, विश्लेषण करून, तसा मी आहे अशी धारणा करतो, आकाशतत्त्वाप्रमाणे ''खग'' हे आकाशाचे नांव आहे, ब्रह्माचेही नांव आहे. पण खग म्हणजे आकाशाप्रमाणे - असंग आहे आणि आकाशाप्रमाणे देश मर्यादारहीत आहे. आकाशाला दत्तात्रेयांनी गुरू केले आणि त्या आकाशापासून असंग हा बोध घेतलेला आहे. सर्वांतर्यामी असलेला प्रत्यग् ब्रह्मापर्यंत आपली बुद्धी नेणे हे दिगंबरा पदार्थाचे अनुसंधान करणे आहे.

प्रत्यग् ब्रह्मापर्यंत आपली बुद्धी नेणे फार कठीण आहे म्हणतात.

तार्किकांना हे सांपडणार नाही असे आचार्य महाराजांनी स्पष्ट सांगितले आहे. तिथे आंतमध्ये प्रवेश नाही. कारण साक्षी म्हणून जो आहे तो जगात कुठे अनुभवाला येत नाही. निर्विकारी आणि स्वयंप्रकाशी आत्मतत्वाचा बुद्धीने ठरवून अनुभव घ्यायचा आहे. त्याकरता योगमार्ग सांगितला आहे किंवा भक्तीमार्ग आहे. तर त्या स्वरूपानुसंधाना पर्यंत बुद्धी आली. मी साक्षी आहे इथे सुखदु:ख वगैरे काही नाही. सुख दु:खादी होणारी द्वंद्व हा फक्त पाहातो आहे. त्या सर्वांचा मी साक्षी आहे. जसा मी साक्षी आहे तसा दुसरा एखादाही साक्षी आहे. व्यापक दृष्टी, सर्व साक्षी, सर्वव्यापी एकच आहे. जसे जीव अनंत आहेत तसे साक्षीही अनंत होतील. साक्षीस्वरूप अद्यापी मर्यादित राहीलेलं आहे. आत्मस्वरूपाचे जे निरनिराळे विभाग आहेत, अंश आहेत कल्पनेने दाखविलेले, ते सगळे अंश अजून लक्षात आलेले नाहीत. केवळ निर्विकार, असंग एवढंच ठरलेलं आहे. याकरता अनंत जन्मांचा अभ्यास, सुकृत आहे, महात्म्यांची कृपा आहे. त्यामुळे बुद्धी येथपर्यंत येऊन पोहोचली आहे.

आणि साक्षीस्वरूप समजल्यानंतर ते अनेक आहे. साक्षी जो आहे, तो सर्वत्र व्यापक आहे. कालमर्यादा असेल पण देशमर्यादा त्याला नाहीये. ''सर्वगत:'' एवढेच समजून घ्यायचे आहे.

## *ते पूर्ण ब्रह्म आणि हे प्रत्यग् ब्रह्म*

साक्षी ब्रह्म पूर्ण आहे. सर्वव्यापी आहे. सर्वत्र एकच आहे. हे दुसऱ्यांदा ''दिगंबरा'' शब्दाच्या अर्थात त्यांनी सांगितले आहे. दिशा एक तत्त्व आहे, काल एक तत्त्व आहे, आकाश एक तत्त्व आहे, परंतु

उपाधीमुळे त्यांच्यात भेद दिसतो. भांड्यातले, खोलीतले, ताटातले आकाश निराळे हा जो भेद दिसतो तो उपाधीमुळे दिसतो. जसं काल हे एक तत्त्व असताना कालाची उपाधी क्रियेवरुन त्यांनी मानलेली आहे. आणि त्या क्रियेवरुन कालाचा भेद शास्त्रकारांनी मानला आहे. साठ सेकंदाला एक मिनिट, साठ मिनिटे म्हणजे एक तास ही नांवे आपण जरी दिली असली (म्हणजे भेद केला असला) तरी वस्तुत: कालतत्त्व एकच आहे. त्याचप्रमाणे एक दिक्तत्त्व मानून ते जसे सर्वव्यापी आहे त्याप्रमाणे पूर्ण ब्रह्म आहे.

साक्षीभाव जो आहे तो सुद्धा नाहीसा झाला पाहिजे. मी साक्षी आहे आणि साक्ष निराळे आहे पुन्हा हा भ्रम अद्यापी शिल्लक राहिला आहे तोही जायला पाहिजे. तर साक्षीस्वरूप सर्वव्यापी व पूर्ण आहे. हे कळण्याकरता ''सचित् सुखघन मायातीतम्'' सच्चिदानंद स्वरूप जे आहे सत् स्वरूप याचा अर्थ अविनाशी आहे, चित्स्वरूप म्हणजे स्वयंप्रकाशी आहे. दुसऱ्याच्या प्रकाशाची आवश्यकता नाही. सूर्य, चंद्रादिकांना देखील त्यांच्यामुळे प्रकाश आला आहे. ''यदादित्य गतम् तेजो .... विधी मामकाम्'' असं भगवान म्हणताहेत. असं सर्व प्रकाशी एक तत्त्व आहे आणि आनंदरूप आहे. तो आनंद सर्वसिद्ध आनंद आहे.

आणि ''मायातीतम्'' मायेने निर्माण झालेल्या भौतिक पदार्थांच्याही पलिकडचे आहे. हे दुसऱ्या ''दिगंबरा'' शब्दाने सांगितले आहे. आणि ही दोन्ही तत्त्वे एकच आहेत हे दुसऱ्या ''दिगंबरा'' शब्दाने सांगितले आहे.

श्रीपादवल्लभ हेही त्याच्यामध्ये घातलेलं आहे. निर्गुण निराकार असं जे परम आत्मतत्त्व आहे ते परमतत्त्व साक्षीरूपाने आधी दाखवलं गेलं. पुन्हा सर्वसाक्षी सर्वव्यापी अशा परिपूर्ण रूपाने त्याचे प्रगटीकरण केलेले आहे. अगोदर साक्षीचे अनुसंधान केले. अहम् ब्रह्म म्हणजे अहम् साक्षी असा मनाचा अभ्यास होण्याकरता मनाचं सहाय्य फार पाहिजे. आणि हे मनाचं सहाय्य होण्याकरता शास्त्रकारांनी बाकीची साधने सांगितली आहेत. त्यासाठी भक्तीयोगाचा पुरस्कार महाराजांनी याठिकाणी केला आहे. श्रीपादवल्लभ हे जे सगुण स्वरूप व्यक्त झालं, श्रीपादवल्लभ ज्या स्थानामध्ये राहीले त्या स्थानात राहणाऱ्यांची ही इष्टसिद्धी होते. श्रीपादवल्लभ ज्या स्थानात राहीले त्या स्थानात जर साधकाने निवास केला तर यज्ञ, तप, दान इत्यादी करून मिळणाऱ्या फलापेक्षा कितीतरी अधिकपट फल त्याला मिळते. त्याची प्रगती जास्त लवकर होते. श्रीपादांचे स्वरूप हे फक्त भौतिक शरीर नसून ज्ञानमय सगुणरूप त्यांनी धारण केले आहे. असा परमेश्वर स्वरूपाचा अवतार ज्या ठिकाणी राहीला ते स्थानही पवित्र होऊन जात आहे. स्थानाचे महत्त्व आहे. ज्ञानेश्वर महाराज सातशे वर्षे झाली समाधी लावून बसले आहेत. तिथे जाणाऱ्या येणाऱ्या लोकांची कार्यसिद्धी कशी होते? त्यांना बातमी कोण पोहोचविती? सिद्धपुरुषांच्या या स्थानामध्येच असं काही वैशिष्ट्य निर्माण झालंय की तिथे जाणाऱ्या भक्तांच्या मनोकामना पूर्ण होतात.

# साधनेतील विघ्ने

आत्मानुसंधान करणाऱ्या साधकांना निरनिराळ्या विघ्नांना तोंड द्यावे लागते. पहिले विघ्नं म्हणजे झोप, स्वरूपानुसंधानास बसल्यावर जर झोप आली तर मनाचा लय होतो. कसे काय मग अनुसंधान करायचे? त्यासाठी आहार-विहाराचे कटाक्षाने पालन व्हायला पाहिजे. हिताहार मिताहार इत्यादी पाळले पाहिजेत म्हणजे हा लय दोष उत्पन्न होत नाही. त्यानंतरचा मोठा दोष म्हणजे अनेक प्रकारच्या वृत्ती मनात निर्माण होत आहेत. आणि त्या वृत्तीतच माणूस रमून जातो. वृत्ती निर्माण होणं हा संसार आहे. आणि वृत्ती नाहीशी होणं हा मनोनाश आहे. वृत्ती निर्माण होऊन स्वरूपानुसंधानात विक्षेप उत्पन्न करतात. आपल्या अंत:करणात षड्विकारादी दोष किती प्रबळ आहेत याचा पत्ता आम्हाला लागत नाही. प्रत्यक्ष ते विकार प्रगट झाल्यानंतरही ते जाणवत नाहीत. रसास्वाद हा एक मोठा भयंकर दोष आहे. ज्यांना प्रगती साधावयाची आहे ते रसास्वादाच्या मागे लागत नाहीत. आपली प्रसिद्धी आपणच आपल्या तोंडाने करायची, व्यवहारात जरी हे उपयोगी असले तरी परमार्थात हा दोष म्हणून मानला आहे. मला इतका अनुभव आलेला आहे, माझी एवढी प्रगती झालेली आहे असे स्वत:च सांगत सुटायचे. आपल्याला जो काही थोडा फार चांगला अनुभव आला त्याची आपल्या मुखानेच प्रसिद्धी करायची. प्रगती शब्दाचा अर्थ काय समजायचा, साधन व्यवस्थित चाललेलं आहे. ती ईश्वराची कृपा आहे असं समजायला काय हरकत आहे? आपल्याकडे त्याचं कर्तृत्व घ्यायची काय गरज आहे? या रसास्वादातच सर्व काल निघून जातो. मला असा अनुभव

येतो आहे, माझं चित्त इतकं सात्विक झालं आहे. असे समजणं त्याप्रमाणे लोकांना सांगणं हा रसास्वाद घात करणारा आहे. या रसास्वाद दोषामुळे साधनेमध्ये प्रतिबंध निर्माण होतो आहे. असे अनेक दोष आहेत.

आत्मस्वरूपाचे जे अनुसंधान की मी साक्षीरूप आहे, पूर्णब्रह्म मी आहे. याचा निदिध्यास व्हायला हवा. निदिध्यास म्हणजे साक्षात्कार नाहीये. पण साक्षात्काराच्या जवळ जवळ असलेली ज्ञानभूमिका आहे. श्रवण ही सुद्धा ज्ञानभूमिका आहे. मनन, चिकित्सा करणं ही सुद्धा ज्ञानभूमिका आहे. त्याच्यानंतर मनाचा लय झाल्यावर आत्मस्वरूपाचं अनुसंधान करणं ही तिसरी भूमिका आहे. याच्यातून आपलं अंत:करण अखंड त्या परमेश्वराच्या ठिकाणी स्थिर होत गेलं तर मग ती समाधी अवस्था आहे. आणि समाधीतून पुढे साक्षात्कार होतोय.

तर या अवस्थेमध्ये पोहोचण्यामध्ये येणारी जी असंख्य विघ्ने आहेत त्यांचं निरासन कसं होणार? ही मोठी अडचण आहे जीवाला. बुद्धी स्वतंत्र आहे. माझी बुद्धी आहे. माझी इंद्रिये आहेत. असे समजतो आपण पण तसे नाहीये. जेव्हा शरीराला वेदना होतात तेव्हा त्याकडे आपण दुर्लक्ष करू शकत नाही. सर्पदंश झाल्यावरही मोठे महाराज समाधी लावून बसत होते. एकदा तर आठ तास बसले म्हणे. पण तसे तरी आम्हाला कुठे जमतंय? राजेश्वरशास्त्री द्रविड एकदा ग्रंथालयामध्ये जाऊन बसले की दोन दोन दिवस बसत असत. अन्न पाण्याची आठवणही येत नसे त्यांना. आनंद आहे. विद्यानंद स्वतंत्र

आहे. इंद्रियानंद जरी लोकांना मोठा वाटला तरी तो अगदी अल्प, अस्थिर आहे. पण विषयापासून, देहापासून मन परावृत्त करण्याची तयारी पाहिजे. ईश्वर दयाळू आहे. भक्तांचं कल्याण करण्यासाठी निरनिराळे अवतार झाले आहेत.

नक्र आणि गजेंद्राची कथा सर्वांना माहीत आहे. नक्र गजेंद्राला पाय धरून आंत घेऊन चालला आहे. गजेंद्राच्या शरीरातील सामर्थ्य संपत आलेलं आहे. त्याला कळून चुकलं की आता आपण बाहेर येऊ शकत नाही. मग पूर्व जन्मात त्याच्याकडून जे काही आत्मानुसंधान घडलेलं होते त्याचंच स्मरण करून तो परमेश्वराला शरण गेलेला होता. परमेश्वराची मोठी स्तुती त्याने केली. त्यात परमात्म्याच्या स्वरूपाचं वर्णन त्याने केले आहे. आमच्यासारख्या बुद्धिवाद्याला वाटेल हत्ती कधी स्तुती करतो का? पण चंद्रलोकापर्यंत बुद्धी (मानव) जाऊ शकते हे अगोदर कोणी मान्य केलं होतं का? पण शक्ती आधी मान्य करावी लागते. त्या शक्तीचा विकास कसा करून घ्यायचा ती साधना आम्हाला मान्य नाही. किंवा सांगणाऱ्यावर विश्वास नाही. हा आपल्या बुद्धीचा दोष न समजता अशक्यच आपण समजतो. ***असंभावना हा फार मोठा दोष आहे.***

***हा असंभावना हा दोष बुद्धीतून गेल्याशिवाय परमार्थ साध्य होणं शक्य नाही. संभावना वाटली पाहिजे. मान्य केली पाहिजे, शक्यतेची भावना निर्माण झाली पाहिजे. म्हणजे मग संशय कमी होतो. संशय दोन असतात, असेल किंवा नसेल पण बुद्धिवाद्याला यातले काहीच मान्य नाही. आहेही मान्य नाही, नाही असेही***

*म्हणत नाही. त्यामुळे अर्धवट स्थिती होते. ''संशयात्मा विनश्यती'' होईल असे असू शकेल, असे घडणे शक्य आहे, संभावनात्मक ज्ञान म्हणजे संशयाच्या वरची पायरी आहे.*

आणि त्याच्या नंतर निर्णयात्मक बुद्धी निर्णयापर्यंत जाऊन पोहोचते आहे. असा बुद्धीचा विकास होऊ शकतो आहे. आणि तो जो आहे, त्याने मागच्या जन्मामध्ये केलेले जे साधन आहे, त्या साधनाचा त्याला इतका अनुभव आलेला आहे म्हणा, त्या साधनाचं महत्त्व इतकं आहे म्हणा की, या पशूच्या (गजेंद्राच्या) जन्मामध्ये आलेला असतानासुद्धा त्या बुद्धीवर ते संस्कार कायम असू शकतात.

बुद्धितत्त्व हे अगदी अविनाशी आहे. जीवनमुक्ती होईपर्यंत बुद्धितत्त्व बरोबर राहणार आहे. शास्त्रकारसुद्धा बुद्धीनेच आत्मतत्त्व दिसू शकतं म्हणून बुद्धितत्त्वाचा पुरस्कार करतात. त्या गजेंद्राचेसुद्धा शुकाचार्य महाराजांनी कौतुक केलं आहे. त्या गजेंद्राने म्हणे सर्वव्यापी जे ईश्वर तत्त्व आहे त्याची प्रार्थना केली. सर्व जग ज्याने निर्माण केलं, सर्व जीवांच्या बुद्धीला प्रेरणा करणारा जो आहे, ज्याच्या शक्तीने या सर्व विश्वाचे कार्य चाललेलं आहे त्याला मी शरण आलेलो आहे अशी त्या गजेंद्राने प्रार्थना केल्यानंतर मुद्दाम शुकाचार्य वर्णन करतायत -- आपल्या नावाचा अभिमान देवादिकांनासुद्धा आहे. पशु जन्माला येऊन सुद्धा गजेंद्राची बुद्धी इतकी शुद्ध झाली होती की सर्व ठिकाणी एकच परमात्म तत्त्व आहे याची त्याला जाणीव होती. बुद्धी बरोबर असली म्हणजे ती अशा रीतीने कोणत्याही जन्माध्ये उपयोगी पडते.

तर या प्रमाणे श्रीपादवल्लभ जे आहे ते नांव प्राप्त झालेलं आहे ते नक्र आणि गजेंद्र या उदाहरणावरून झालेलं आहे. नांव आणि रूप धारण करून भगवान येताहेत. द्रौपदीचं आणखी उदाहरण दिलेलं आहे. द्रौपदीसारखी साध्वी स्त्री, गृहस्थाश्रमी पुरूषाचा धर्म म्हणजे देवपूजा इ. पंचयज्ञ करणं, अन्नवस्त्र कोणाला हवं असल्यास देणं, त्याचं रक्षण करणं, गुरूसेवा, वेदाध्ययन इ. धर्मराजांनी सूर्यनारायणाची प्रार्थना करून वनवासातसुद्धा गृहस्थाश्रम धर्माचं पालन करण्यासाठी ते पात्रं मिळवलं. द्रौपदीचं जेवण झालं की ते पात्रं अन्न देणार नाही, म्हणजे द्रौपदीला सर्वात शेवटी जेवायला हवे. म्हणजे कर्म करायचे तरी किती कठीण आहे ! सत्वपरीक्षाच आहे. ध्येय पूर्ण करण्यासाठी मनाचा निर्धार किती पाहिजे. भक्तीमार्ग, ज्ञानमार्ग हे तर पुढचेच आहे. पण कर्ममार्गातही निश्चित दृष्टी (बुद्धी) पाहिजे. दुर्योधनाने दुर्वास ऋषींना प्रसन्न करून घेतले आणि पांडवांचं सत्व भंग करण्यासाठी द्रौपदीचे जेवण झाल्यावर अतिथी म्हणून तिथे जेवायला पाठविले. म्हणजे दुर्योधनासारखी मंडळीही सत्संग करतात, पण त्याचा असा दुरूपयोग करतात. वास्तविक पाहाता दुर्वास ऋषींना प्रसन्न करून घेणं म्हणजे काही सोपी गोष्ट नाही. मनाचा निग्रह करावा लागला. पण ते सर्व त्याने केले. म्हणजे ही जी असुरी प्रवृत्तीची मंडळी आहेत त्यांच्या जवळ मनोनिग्रह आहे, इंद्रियांचा संयम आहे, तितिक्षा इ. सर्व साधनं आहेत. दुर्वास ऋषी प्रसन्न होऊन, काय हवा तो वर मागून घे म्हणाले. दुर्योधनाने असा वर मागितला की द्रौपदीचं जेवण झाल्यावर सर्व शिष्यांसह तुम्ही

पांडवांच्या आश्रमात जा. म्हणजे पाहुण्यांच्या हातून साप मारायचा. पाहूणा मेला तरी चालेल, साप मेला तरी चालेल. त्यामुळे दुर्वास ऋषींना नाईलाज म्हणून जावे लागले. पांडव योग्य आहेत, धर्मनिष्ठ आहेत. हे काही त्यांना माहीत नव्हते असे नाही. ते त्यांच्या आश्रमात गेले. धर्मराज मोठा धर्मज्ञ आहे. धर्मराज अरण्यातही अतिथी धर्माचे पालन करीत होता. पण आता द्रौपदीचे जेवण होऊन गेलं असल्यामुळे दुर्वास ऋषी आणि त्यांच्या शिष्य समुदायाला जेवण देणार कसे? न द्यावं तर दुर्वासांचा कोप होऊन शाप देणार ते.

पण द्रौपदीही काही कमी नव्हती. सर्व भगवंताचीच शक्ती आहे, ''त्वमेव सर्वम् मम देव देव'' ही जी फार कठीण भूमिका आहे ती द्रौपदीला जमली होती. वास्तविक पाहाता ''त्वमेव सर्वम् मम देव देव'' ही भूमिका उत्पन्न होणं कठीण आहे. साधनावरती विश्वास असल्यानंतर मी साधन करतो असा स्वत:वरचा विश्वास ज्याचं पुढे अभिमानामध्ये रूपांतर होत आहे. पण द्रौपदीने तळमळीने श्रीकृष्णांचे आवाहन केले आहे. भगवान आलेले आहेत आणि भाजीचे पान भक्षण करून -- पत्रं, पुष्पं, फलं, तोयं -- हे स्वत: आचरणात आणून, द्रौपदीच्या प्रेमाला महत्त्व दिलेलं आहे. आणि मग परत त्या थाळीने अन्न दिले आणि द्रौपदीच्या भक्ती भूमिकेमुळे पांडव संकटातून मुक्त झाले आहेत. भक्तीभावासाठी भगवान वाटेल त्या वेळेला येऊन संकटातून मुक्त करतात. अंबरीष राजालाही भगवंतानेच दुर्वासाच्या शापातून मुक्त केलं आहे.

सकाम भक्त आहे. श्रीपादवल्लभांचा नवस फेडून सहस्त्र ब्राह्मण

भोजन घालण्यासाठी कुरूगड्डीला निघाला आहे. वाटेत चोरांनी गाठून त्याचा फसवून वध केला आहे. परंतु भगवंताची वात्सल्यपूर्ण शक्ती अशी आहे की भगवान त्या ठिकाणी येऊन त्या चोराला मारून, ब्राह्मणाला जिवंत केलं आहे आणि त्याचा तो संकल्प त्याच जन्मात तो पूर्ण करून घेतला आहे. मेलेला आहे हे पाहिल्यावर देवांना तत्त्वज्ञान सांगता आलं नसतं काय? जा बाबा तुझं आयुष्य संपलेलं आहे वगैरे उत्तर त्यांना देता आलं असतं. अशा तऱ्हेने भक्तांना भगवंताचं सहाय्य होत असतं.

निर्विकार ब्रह्मरूप समजणे, त्याच प्रमाणे सर्वव्यापक ब्रह्म जे आहे तेही समजून घेणं, त्याचं अनुसंधान करणं, अनुसंधान करताना जरी राहीलं नाही तरी हरकत नाही, सगुण कनिष्ठ, निर्गुण श्रेष्ठ असा भेदभाव तिथे नाही. भक्त कार्य करणारा भगवानच साक्षात ब्रह्मरूप आहे. निर्गुण निराकार तोच आहे. त्याची प्राप्ती मला व्हावी. अनंत विक्षेप (काम, क्रोधरूपी) चित्तामध्ये उत्पन्न होताहेत. चित्त स्थिर करण्याचं सामर्थ्य माझ्याजवळ नाहीये. साधन मिळालं तरी, साधनावरती तरी तितका पूर्ण विश्वास कुठं आहे? त्यामुळे त्या साधनाचाही उपयोग मी करून घेऊ शकत नाहीये. याकरता तुमची प्राप्ती मला व्हावी, तुमचं सहाय्य मला व्हावं ही प्रार्थना या आरतीत शेवटी केलेली आहे. अशा रीतीने सामान्यत: एकंदर तत्त्वानुसंधान, वेदान्त सिद्धांत यात मांडलेले आहेत. त्या सिद्धांतापर्यंत आपली बुद्धी जाण्याकरीता भगवद्‌भक्तीचे महत्त्वही या ठिकाणी वर्णन केलेलं आहे. आपण जर कृपा केलीत तरच मला आपलं स्वरूप समजून

घेणार आहे. माझं कर्तृत्व काहीही नाही अशी अनन्य भावाने प्रार्थना शेवटी केली आहे. याचं नित्य अनुसंधान करीत राहून या आरतीचं पठण अर्थाकडे लक्ष देऊन जर झालं तर त्याचं फळ आपल्याला मिळणार आहे. हे एक वाङ्मय तपच आहे. ***अर्थानुसंधान नाही घडलं तरी जितकं वाणीने होईल तेवढे करावे. त्या वाङ्मय तपाचेही महत्व काही कमी नाही. वाङ्मय तपाचं पर्यवसान मानस तपापर्यंत होत आहे. हेच महाराजांनी याच्यामध्ये सांगितले आहे.***

**दिगंबरा दिगंबरा श्रीपादवल्लभ दिगंबरा ॥**
**आरती हे तव चरणी राहो ॥**
**आरती हे तव चरणी राहो ॥ नति तति गुरुवरा ॥ धृ. ॥**
**दिग्भिरवेष्टितमम्बरमेव प्रत्यग्ब्रह्मेति ॥**
**खंब्रह्मेति श्रुतिरपि वदति खंब्रह्मेति श्रुतिरपि वदति दिगंबराचेति ॥ १ ॥**
**दिगवत् चाम्बरमेव व्यापक पूर्णब्रह्मेति ॥**
**सच्चित्सुखघनमायातीतं सच्चित्सुखघनमायातीतं वदति ॥ २ ॥**
**श्रीपादवल्लभ नाम प्राप हि नक्रगजेंद्रमिव । द्रौपद्यंबरीषचोर ।**
**द्रौपद्यंबरीषचोरग्रसितद्विजमेव ॥ ३ ॥**
**दिगंबरा गुरु वासुदेव दत्तस्त्वंब्रह्म ॥ कामक्रोधग्रसितं मां लभ ।**
**कामक्रोधग्रसितं मां लभ तथैव झटिति वह ॥ ४ ॥ दिगंबरा. ।**

॥ दिगंबरा दिगंबरा श्रीपादवल्लभ दिगंबरा ॥ या अष्टाक्षरी मंत्रातले पहिले दोन शब्द ''दिगंबरा दिगंबरा'' ही दोन संबोधने आहेत. प्रथम ''दिगंबरा दिगंबरा'' या दोन शब्दांनी साक्षी स्वरूप आत्म्याचे जे साक्षीरूप आहे, म्हणजे शुद्ध ''अहम्'' पदार्थ. जीवाचे

शुद्ध स्वरूप याचं अनुसंधान हे पहिल्या शब्दाने आहे. आणि दुसऱ्या ''दिगंबरा'' या शब्दाने सर्व व्यापी, सर्व विश्वाचे अधिष्ठान असं जे ब्रह्म आहे, परब्रह्म ज्याला म्हणतात. प्रत्यग् ब्रह्म आणि परब्रह्म, अहम् आणि ब्रह्म हे दोन्ही एकच आहेत. हे व्यापक ब्रह्माचं स्वरूप, परब्रह्माचं स्वरूप त्याचं अनुसंधान दुसऱ्या ''दिगंबरा'' या संबोधनाने केलेले आहे.

तेच ब्रह्म स्वरूप भक्ताचं संरक्षण करण्याकरता -- ***रक्षण याचा अर्थ भक्तांची बुद्धी शुद्ध करून आपल्या ठिकाणी स्थिर करणं, हे संरक्षण आहे. त्या करता ''श्रीपादवल्लभ'' हे तिसरे संबोधन आहे. ''श्रीपाद'' आणि ''वल्लभ'' असे दोन शब्द याच्यात आहेत. ''श्री:पादेयस्य'' -- ज्याच्या चरणाजवळ श्री आहे. लक्ष्मीयुक्त परमात्मा, शक्तीयुक्त परमात्म्याचे स्मरण श्रीपाद या शब्दाने केलं आहे.***

***तेव्हा सर्व श्री -- लक्ष्मीदेवी ज्याच्याजवळ आहे आणि म्हणून तो सर्वांना वल्लभ आहे. म्हणजे प्रिय आहे. सर्वांना संकटातून मुक्त करून कल्याण करणारा आहे म्हणून तो वल्लभ म्हणजे प्रिय आहे. तेव्हा सर्व श्री मायाशक्ती ज्याच्याजवळ आहे, आणि सर्वही भक्तांना जो अत्यंत प्रिय आहे.*** तो प्रिय कसा आहे? भक्तांची संकटं तो कसा दूर करतो? हे पुढे सांगितले आहे.

श्रीपादवल्लभ नाम प्राप हि नक्रगजेंद्रमिव ।
द्रौपद्यंबरीषचोरग्रसितद्विजमेव

चार भक्तांची उदाहरणं या ठिकाणी दिलेली आहेत. नक्र-गजेंद्र.

नक्राने गजेंद्राला धरलेलं आहे. अत्यंत आर्त होऊन भगवंतांना तो बोलावतो आहे. त्यावेळी भगवान त्या ठिकाणी येऊन त्यांनी त्या नक्राचा नाश करून गजेंद्राला मुक्त केलं. नक्रापासून तर सोडवलंच पण गजयोनीतूनही मुक्त केलं. तो, वैकुंठलोकात राहणाऱ्या भगवत् भक्तांचे रूप मिळून, वैकुंठलोकाला गेला.

द्रौपदीचंही उदाहरण आहे. द्रौपदीची विटंबना करायचं ठरवलं दु:शासनाने. त्यावेळेला आर्त झालेल्या द्रौपदीने हाक मारल्यानंतर तिथे येऊन तिला वस्त्र देऊन भगवंतांनी तिचं संरक्षण केलं.

अंबरीष राजा. दुर्वास ऋषींचा शाप होणार पण त्याने प्रार्थना केल्यावरून, स्मरण केल्यावरून भगवान त्या ठिकाणी आले आणि त्यांनी त्याचा शाप स्वत: घेतला. त्याचंही रक्षण केलेलं आहे.

आणि चोरग्रसितद्विज. गुरूचरित्राच्या दहाव्या अध्यायात जी कथा सांगितलेली आहे. श्रीपादवल्लभांचा कुरवपुरचा मोठा भक्त नवसाप्रमाणे अन्नसंतर्पण करायला निघाला असताना चोरांनी त्याचा नाश केला त्यावेळी श्रीपादवल्लभांनी त्या ठिकाणी येऊन त्या चोरांना मारलं, त्याला जिवंत केलं. त्याचा नवस त्याच जन्मामध्ये फेडला गेलेला आहे. तेही उदाहरण आहे.

तर अशा आर्त झालेल्या भक्तांना सुरक्षित ठेवणं -- न मे भक्त प्रणश्यति -- या आपल्या प्रतिज्ञेप्रमाणे ही लीला भगवंतांनी केली, भक्त संरक्षण केलं, ''श्रीपादवल्लभ'' या संबोधनामध्ये हे सर्व सुचवलेलं आहे. आणि शेवटी अशी प्रार्थना केली आहे.

दिगंबरा गुरू वासुदेव दत्तस्त्वम् ब्रह्म ।

कामक्रोधग्रसितम् माम् लभ तथैव झटिति वह ॥

हे दिगंबरा ! ''श्रीपादवत् लभ'' असा एक अर्थ केला. श्रीपाद ज्याप्रमाणे विष्णुरुपानी त्या गजेंद्राला, द्रौपदीला त्याच प्रमाणे ''लभ'' म्हणजे मलाही आपली प्राप्ती व्हावी. कारण मीही क्रामक्रोधग्रसितम्. चौथ्या ''दिगंबरा'' अर्थ सांगताना गुरू स्वरूप आहे, वासुदेव रूप आहे, दत्तरूप आपण आहात ! म्हणजे ही तिन्हीही रूपे एकच आहेत. ईश्वराचं स्वरूप ब्रह्म स्वरूप, दत्तस्वरूप आणि गुरूस्वरूप सर्वही अनुसंधान एक रूपानं या ठिकाणी केलं आहे.

***वासुदेव याचा अर्थही शास्त्रकारांनी केलेला आहे. ''वस'' धातुचा अर्थ अच्छादन करणे. सर्वही भूतांना आपल्या मायेच्या आवरणाने झाकून टाकलेले आहे. म्हणजे आपलं आत्मस्वरूप त्या भूतांना काही दिसत नाही. आणि स्वत: तो प्रकाशमान आहे. झाकून जरी टाकलेलं असलं तरी आत्मरूप प्रकाशमान आहे.*** अशा हे वासुदेवा ! आणि दत्त:त्वम् ब्रह्म. आपण खरे ब्रह्मा गुरू. वासुदेव दत्तात्रेय. सर्वही आपण ब्रह्मस्वरूपच आहात. मुलं रूपाने अनुसंधान करून प्रार्थना केलेली आहे.

कामक्रोधग्रसितम माम् लभ ॥

मला आपण प्राप्तं व्हा कारण कामक्रोधांनी मी अगदी ग्रासलेलो आहे. ह्या सर्व विकारांनी पिडलेलो आहे. म्हणून मला आपण प्राप्तं व्हा. आणि त्याचप्रमाणे लवकर मला आपल्याकडे न्या. अशी शेवटी प्रार्थना केली आहे.

तर या मंत्रामध्ये ''दिगंबरा'' अशी संबोधने तीन वेळा आलेली

आहेत. तेव्हा पहिल्या ''दिगंबरा'' या संबोधनाने जे जीवाचं साक्षी स्वरूप आहे, शुद्ध अहम् म्हणजे सर्वसाक्षी निर्विकार अहम्. आणि दुसऱ्या ''दिगंबरा'' शब्दाने सर्वव्यापी सच्चिदानंद जे गुरूवर अधिष्ठानरूप विश्व ज्याच्या वर दिसत आहे, भासत आहे असं ते स्वरूप आहे. आणि ते आणि हे अहम् एकच आहे व त्याची प्राप्ती होण्याकरता, मनातले सर्व विकार जाण्याकरता, चौध्या ''दिगंबरा'' शब्दानी अनुसंधान करून, संबोधन करून, श्रीपादांनी म्हणजे लक्ष्मीयुक्त शक्तीयुक्त परमेश्वराच्या स्वरूपाची, सगुणाची प्रार्थना करून आपण मला लवकर आपल्या जवळ न्या, आपलं स्वरूप मला प्राप्त होऊ दे, देहभाव नाहीसा होऊ दे, अशी याच्यामध्ये शेवटी प्रार्थना केलेली आहे.

असा हा एक महामंत्र आहे. या महामंत्राचे सगुण, निर्गुण , व्यापक, अव्यापक अशी जी स्वरूपं आहेत त्या सर्व स्वरूपाचं ऐक्य कसं आहे, ते ऐक्यज्ञान आपल्याला व्हावं आणि आपण कृतार्थ व्हावं अशी प्रार्थना शेवटी यात केली आहे.

म्हणून महाराजांनी या आरतीच्या सहाय्याने या महामंत्राचे स्पष्टीकरणही सांप्रदायात केले आहे.

**॥ अवधूत चिंतन श्री गुरुदेव दत्त ॥**

## - नोंद -

# - नोंद -